


# गोदातीर समाचार


RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026
संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com






* वर्ष ६५ वे * अंक २६२ * नांदेड * शुक्रवार, दि. २ ऑक्टोबर २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211


# सरकारकडून शेती कर्ज वसुलीला स्थगिती

## रब्बी हंगामासाठी पीककर्ज उपलब्ध करून देण्याचे आदेश



**मुंबई (प्रतिनिधी)–** राज्यात अपुऱ्या पावसामुळे गंभीर दुष्काळाची परिस्थिती उद्भवली आहे. राज्य सरकारनं महाराष्ट्रातील तब्बल ३०५ तालुक्यांमध्ये दुष्काळाच्या ट्रिगर वन उपाययोजना लागू करण्याची घोषणा केली. त्यासोबतच राज्य सरकारनं आता शेतकरी आणि पाण्याच्या नियोजनाच्यादृष्टीनं महत्त्वाची पावलं उचलण्यास सुरुवात केली. शासनाने जाहीर केलेल्या दुष्काळग्रस्त तालुक्यांमध्ये आता शेती कर्ज वसुलीला स्थगिती देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दुष्काळाच्या विळख्यात अडकलेल्या बळीराजाला काहीसा दिलासा दिला आहे. फडणवीस सरकारनं शेती कर्ज वसुलीला स्थगिती देण्याचा शासन निर्णय जाहीर केलाय. त्यासोबतच पीक कर्जाचे पुनर्गठन करण्याचेही आदेश या शासन निर्णयात देण्यात आलेत. त्यासोबतच ३० एप्रिल २०२७ पर्यंत प्रक्रिया पूर्ण करा, असे निर्देश राज्यातील बँकांना शासनाकडून देण्यात आलेत. तसेच, शेतकऱ्यांना खरीप हंगामासाठी पीक कर्ज उपलब्ध करून देण्याचे आदेश निर्णयात देण्यात आले आहेत.

राज्यात यंदा अपुऱ्या पावसामुळे कोरडा दुष्काळ पडला आहे. जवळपास ७५ टक्के महाराष्ट्र दुष्काळाच्या सावटाखाली आलाय. राज्य सरकारनं सुरुवातीला २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर केला होता. मात्र, अनेक तालुके दुष्काळाच्या मदतीपासून वंचित राहण्यावरुन राजकीय दबाव निर्माण झाल्यानंतर राज्य सरकारनं दुष्काळी तालुक्यांच्या यादीत आणखी ४३ तालुक्यांचा समावेश केला. यासोबतच राज्य सरकारने आता शेतकरी आणि पाण्याच्या नियोजनाच्यादृष्टीने महत्त्वाची पावले उचलण्यास सुरुवात केली आहे.

दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारनं दहावी आणि बारावीच्या विद्यार्थ्यांचं परीक्षा शुल्क माफ करण्याचा निर्णय जाहीर केलाय. याशिवाय, राज्याचे महसूलमंत्री आणि दुष्काळ निवारण उपसमितीचे अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनीही शेतकऱ्यांच्यादृष्टीनं एक महत्त्वाची घोषणा केलीय. दुष्काळात शेतकऱ्यांच्या दारी बँक किंवा पतसंस्थेचा कोणताही कर्मचारी जाता कामा नये, अशी सक्त ताकीद चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिलीय. यासाठी जिल्हाधिकारी आणि पोलीस अधिकारी यांना सूचना देण्यात याव्यात, असंही त्यांनी सांगितलंय.

दुष्काळाच्या काळात गरीब शेतकरी आणि शेतमजूर यांना मोठा फटका बसू नये, यासाठी त्यांना गावात रोजगार उपलब्ध करुन देण्याच्यादृष्टीनं राज्य सरकारनं पावलं उचलली आहेत. त्यासाठी रोजगार हमी योजना विभागानं ६ हजार ७२८ कोटींचा निधी उपलब्ध करुन दिलाय. या माध्यमातून दुष्काळी भागात सिंचनाची कामं, गायगोठे, वैयक्तिक फळबाग लागवड , बोअरवेल पुर्नभरण, बांबू लागवड, प्रधानमंत्री आवास योजना, रेशीम उद्योगासाठी शेड, बांधकाम आणि कंपोस्ट खड्ड्यांचे बांधकाम, सार्वजनिक तलावांची दुरुस्ती अशाप्रकारची कामं हाती घेतली जाणार आहेत.

# ग्रामस्वच्छता चळवळीचे ज्येष्ठ शिलेदार माधवराव पाटील शेळगावकर यांचे निधन

## शेळगाव गौरी येथे शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार



**शंकरनगर (प्रतिनिधी)–** संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान महाराष्ट्र राज्याचे प्रथम अध्यक्ष तथा नांदेड जिल्ह्यातील ज्येष्ठ समाजनेते माधवराव रामचंद्र पाटील शेळगावकर (वय ८१) यांचे गुरुवार, दि. १ ऑक्टोबर रोजी पहाटे नांदेड येथील गंगा हॉस्पिटलमध्ये उपचारादरम्यान अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या निधनाची वार्ता समजताच शेळगाव गौरीसह परिसरात शोककळा पसरली. शेळगाव गौरी येथे विविध क्षेत्रांतील मान्यवर, लोकप्रतिनिधी आणि ग्रामस्थांच्या उपस्थितीत शोकाकुल वातावरणात त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

ग्रामस्वच्छता, सामाजिक समता, ग्रामविकास आणि शेतकरी हिताचा ध्यास घेत माधवराव पाटील शेळगावकर यांनी आयुष्यभर समाजकार्यास वाहून घेतले. गेल्या सुमारे २५ वर्षांत महाराष्ट्रासह देशातील दोन हजारांहून अधिक गावांना भेटी देत त्यांनी स्वच्छता, लोकसहभाग आणि ग्रामविकासाचा संदेश पोहोचविला. 'माझे गाव, माझा तालुका, माझा जिल्हा आणि माझा महाराष्ट्र स्वच्छ, सुंदर व निर्मळ झाला पाहिजे' हा त्यांचा जीवनध्येयाचा भाग होता.

सर्वसामान्य नागरिक, शेतकरी, शेतमजूर आणि वंचित घटकांना सन्मानाने जगता यावे, यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले. गावाच्या विकासासोबतच युवकांनी व्यसनांपासून दूर राहून शिक्षण, कर्तृत्व आणि चांगल्या विचारांची कास धरावी, यासाठीही त्यांनी जनजागृती केली.

माधवराव शेळगावकर यांचा जन्म १ जानेवारी १९४५ रोजी शेळगाव (पान ३ वर...)

### समाजासाठी झटणारे नेतृत्व गमावले –खा. चव्हाण

ज्येष्ठ नेते माधवरावजी पाटील शेळगावकर यांच्या निधनाचे वृत्त अत्यंत दुःखद आहे. शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी आक्रमकपणे लढणारे नेते म्हणून त्यांची ओळख होती. माधवरावजींच्या निधनाने सार्वजनिक जीवनातील एक अनुभवी, तत्त्वनिष्ठ आणि समाजासाठी आयुष्यभर झटणारे नेतृत्व हरपले आहे. त्यांच्या जाण्याने निर्माण झालेली पोकळी निश्चितच भरून निघणारी नाही, असा शोकसंदेश माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण यांनी व्यक्त केला आहे.

### नांदेड जिल्ह्याची मोठी हानी –आ. चिखलीकर

स्वच्छ भारत अभियानाच्या माध्यमातून नांदेड जिल्ह्याचे नाव महाराष्ट्राच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी कोरणारे स्वच्छतादूत माधवराव पाटील शेळगावकर यांच्या निधनाने जिल्ह्याची मोठी हानी झाली आहे. माधवराव पाटील शेळगावकर आणि चिखलीकर कुटुंबीयांचे अत्यंत जिव्हाळ्याचे संबंध होते. शांतिदूत गोविंदराव पाटील चिखलीकर यांच्या काळापासून ते माझ्या पिढीपर्यंत शेळगावकर कुटुंबीयांशी स्नेहाचे संबंध कायम राहिले, अशा शब्दांत आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी श्रद्धांजली अर्पण केली.

### अस्तित्वासाठी स्पष्ट लढणारे नेतृत्व हरवले –कमलकिशोर कदम

स्वच्छतादूत माधवराव शेळगावकर यांनी शेतकऱ्यांच्या मालाला भाव मिळायला पाहिजे, यासाठी त्यांनी आंदोलने केली. तात्विक मुद्दे हातात घेऊन सर्वसामान्यांच्या अस्तित्वासाठी यौद्ध्याप्रमाणे ते लढले. असा निर्भय नेता समाजाला आता मिळणार नाही. माधवराव शेळगावकर यांच्या निधनाने फार मोठे दुःख झाले आहे, असा शोकसंदेश राज्याचे माजी शिक्षणमंत्री कमलकिशोर कदम यांनी व्यक्त केला.

# ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्यासाठी आजपासून सीजेपीचे आंदोलन

**मुंबई (प्रतिनिधी)–** मुख्य केंद्रीय निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्यासाठी आजपासून कॉकरोच जनता पार्टी यांच्यावतीने मुंबई येथील शिवाजी पार्क येथे आंदोलन सुरू करण्यात येणार आहे.

केंद्रीय निवडणूक आयोग ही लोकशाहीची स्वायत्त संस्था न राहता नरेंद्र मोदी आणि अमित शाह यांच्या हातातील बाहुले बनली आहे. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार हे 'देशाचे गद्दार' असून त्यांनी पदावर राहण्याचा नैतिक अधिकार गमावला आहे. त्यांचा तत्काळ राजीनामा घेण्यात यावा आणि त्यांच्यावर थेट फौजदारी गुन्हे दाखल करावेत, असा आरोप कॉकरोच जनता पार्टीचे प्रमुख अभिजीत दिपके यांनी केला आहे. मुंबईत घेतलेल्या आक्रमक पत्रकार परिषदेत त्यांनी दि. २ ऑक्टोबर रोजी दादरच्या शिवाजी पार्क येथून देशव्यापी आंदोलनाची हाक दिली. आंदोलन केल्यास तीन दिवसांनंतरच जामीन मिळेल, अशी धमकी मुख्यमंत्री देत आहेत; पण सरकारने आम्हाला तीन दिवस काय, तीन महिने जरी तुरुंगात डांबले तरी बाहेर येऊन पुन्हा पुन्हा रस्त्यावर उतरू, असा थेट इशाराही दिपके यांनी राज्यकर्त्यांना दिला.

# सुवर्णपदकासाठी महामुकाबला! भारत-पाकिस्तान उद्या भिडणार

**टोकिओ (वृत्तसंस्था)–** आशियाई क्रीडा स्पर्धा २०२६ मध्ये क्रिकेटच्या सुवर्णपदकासाठी भारत आणि पाकिस्तान आमनेसामने येणार आहेत. कट्टर प्रतिस्पर्धी असलेल्या या दोन संघांमध्ये पुन्हा एकदा क्रिकेटच्या मैदानावर महामुकाबला रंगणार आहे. त्यामुळे जगभरातील क्रिकेट चाहत्यांचं लक्ष या सामन्याकडे लागलं आहे. ही लढत उद्या दि. ३ ऑक्टोबर रोजी होणार आहे.

भारताने आशियाई क्रीडा स्पर्धा २०२६ च्या दुसऱ्या उपांत्य फेरीत श्रीलंकेचा तब्बल १२४ धावांनी पराभव केला. या दणदणीत विजयासह श्रेयस अय्यरच्या नेतृत्वाखालील भारतीय संघाने अंतिम फेरीत प्रवेश केला. दुसरीकडे, पाकिस्तानने पहिल्या उपांत्य फेरीत बांगलादेशचा ६ गडी राखून पराभव करत अंतिम सामन्यात स्थान मिळवलं. त्यामुळे आता साहिबजादा फरहानच्या नेतृत्वाखालील पाकिस्तान आणि श्रेयस अय्यरच्या नेतृत्वाखालील भारत यांच्यात सुवर्णपदकासाठी थरारक सामना रंगणार आहे.

भारत आणि पाकिस्तान यांच्यातील आशियाई क्रीडा स्पर्धा २०२६ चा अंतिम सामना शनिवार, ३ ऑक्टोबर रोजी खेळवला जाणार आहे. जपानमधील निशिन येथील कोरोगी स्पोर्ट्स पार्क येथे हा सामना होईल. सामना सकाळी १० वाजता सुरू होणार असून, नाणेफेक सकाळी ९.३० वाजता होईल.

भारत आणि पाकिस्तान यांच्यात आतापर्यंत एकूण १७ टी–२० आंतरराष्ट्रीय सामने खेळले गेले आहेत. यापैकी भारताने तब्बल १४ सामने जिंकले, तर पाकिस्तानला फक्त ३ विजय मिळवता आले आहेत. विशेष म्हणजे, या दोन संघांमधील मागील सहा टी–२० सामन्यांमध्ये भारताने सलग विजय मिळवला आहे. त्यामुळे अंतिम सामन्यापूर्वीची ही आकडेवारी निश्चितच भारतीय संघाचा आत्मविश्वास वाढवणारी आहे.



**नांदेड :** येथील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर ज्येष्ठ नागरिकांच्यावतीने विविध मागण्यांसाठी रिकामे ताट–वाटी–तांब्याचा आवाज करत आंदोलन करण्यात आले. (छाया : करणसिंह बैस)

# चार महिन्यांपासून बंद असलेली जलतरणिका तात्काळ सुरू करा

## नांदेड ऑलिम्पिक असोसिएशनचे मनपा आयुक्तांना निवेदन; प्रशासकीय चौकशीचीही मागणी

**नांदेड (प्रतिनिधी)–** महापालिकेची शांताराम सगणे जलतरणिका मागील चार महिन्यांपासून बंद असल्याने नांदेड जिल्ह्यातील जलतरणपटू, विद्यार्थी, पालक, प्रशिक्षक आणि क्रीडा प्रेमींमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. जलतरणिका तात्काळ सुरू करण्यात यावी, अशी मागणी करणारे निवेदन मनपा आयुक्तांना देण्यात आले आहे.

शहरातील स्पर्धात्मक जलतरणासाठी महत्त्वाची असलेली ही जलतरणिका तांत्रिक अडचणीच्या कारणामुळे बंद असल्याचे सांगण्यात येत आहे. मात्र, तात्पुरत्या स्वरूपात आवश्यक दुरुस्ती करून जलतरणिका सुरू करता आली असती. तसेच फिल्टर टाकी, पंप किंवा इतर तांत्रिक यंत्रसामग्रीची आवश्यकता असल्यास त्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्याची मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.



जलतरणिका बंद असल्यामुळे नांदेड शहर व जिल्ह्यातील नियमित सराव करणाऱ्या खेळाडूंच्या प्रशिक्षणावर परिणाम होत असून, शालेय व इतर जलतरण स्पर्धांसाठी विद्यार्थ्यांना नांदेडपासून सुमारे १०० किलोमीटर अंतरावरील सगरोळी, ता. बिलोली येथे जावे लागत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना प्रवासाचा अतिरिक्त खर्च, वेळ आणि शारीरिक त्रास सहन करावा लागत आहे.

दरम्यान, जलतरणिका तात्पुरत्या दुरुस्तीने सुरू होऊ शकत असताना कोट्यवधी रुपयांच्या निधीची आवश्यकता असल्याचे सांगितले जात असल्याची बाबही निवेदनात नमूद करण्यात आली आहे. या प्रकरणाची वस्तुस्थिती स्पष्ट करण्यासाठी स्वतंत्र व निष्पक्ष प्रशासकीय चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे.

जलतरणिका सुरू करण्यासाठी आवश्यक दुरुस्ती कामांचे तातडीने तांत्रिक परीक्षण करून अहवाल तयार करावा, आवश्यक निधी उपलब्ध करून द्यावा आणि जलतरणिका पुन्हा सुरू करण्यासाठी निश्चित कालमर्यादा ठरवावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

तसेच नांदेड शहरातच शालेय व जिल्हास्तरीय जलतरण स्पर्धा आयोजित करण्यासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात याव्यात, अशीही मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. नांदेड जिल्ह्यातील जलतरणपटू आणि विद्यार्थ्यांच्या भवितव्याचा विचार करून मनपा प्रशासनाने या विषयात तातडीने लक्ष घालून शांताराम सगणे जलतरणिका विनाविलंब सुरू करावी, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

## सोनखेडमध्ये डिझेल चोरट्यांना अटक; कारमधून तलवार, खंजर डिझेल जप्त

**नांदेड (प्रतिनिधी)–** महामार्गावर उभ्या असलेल्या वाहनांमधून डिझेल चोरी करणाऱ्या दोघांना सोनखेड पोलिसांनी रंगेहात पकडले आहे. पोलीस हवालदार ज्ञानेश्वर तिडके यांनी दिलेल्या फिर्यादीवरून हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दि. २९ सप्टेंबर रोजी रात्री १०.५५ वाजता सोनखेड येथील छोट्या अंडरब्रिजखाली कार क्र. (एमएच–२६–व्ही–८८८४) मधील दोन तरुण उभ्या वाहनांमधील डिझेल चोरत आहेत. पोलिसांनी कारची झडती घेतली असता डिक्कीमध्ये आणि सीटवर डिझेलने भरलेले २० लिटरचे २ कॅन (एकूण ४० लिटर) आणि रिकामे १३ कॅन आढळले. या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# आज राज्यात नो युपीआय पेमेंट मोहीम

**मुंबई (प्रतिनिधी)–** डिजिटल पेमेंटचे मुख्य माध्यम असलेल्या यूपीआय व्यवहारांवरील एमडीआरच्या मुद्द्यावरून राज्यातील व्यापारी वर्ग आक्रमक झाला आहे. एमडीआरच्या नावाखाली व्यापाऱ्यांवर अतिरिक्त आर्थिक भार टाकला जात असल्याचा आरोप करत, याविरोधात सामूहिक भूमिका मांडण्यासाठी २ ऑक्टोबर रोजी राज्यभरात नो युपीआय–नो पेमेंट मोहीम राबवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अँड ग्रिकल्चरच्यावतीने आयोजित करण्यात आलेल्या ऑनलाईन बैठकीत राज्यातील विविध व्यापारी संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी हा एकमुखाने निर्णय घेतला आहे.

महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष रविंद्र माणगावे यांच्या अध्यक्षतेखाली ही महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. यूपीआय हे डिजिटल पेमेंटचे अत्यंत महत्त्वाचे माध्यम असून चेंबरचा यूपीआयच्या वापराला किंवा डिजिटल व्यवहारांना अजिबात विरोध नाही, असे स्पष्टीकरण या बैठकीत देण्यात आले.


खादी ग्रामोद्योग आयोग (भारत सरकार) द्वारा प्रमाणित G.S.T.IN :-27AAATK9699R1ZB
(ISO - 9001 : 2008 मानांकन प्राप्त)

**मराठवाडा खादी ग्रामोद्योग समिति**

(सोसायटी रजिस्ट्रेशन ॲक्ट 21/1860 अंतर्गत रजिस्टर्ड व पब्लिक ट्रस्ट रजिस्टर्ड नं. ए.एफ. 127 नांदेड)

* अध्यक्ष * डॉ.हंसराज दादारावजी वैद्य
* उपाध्यक्ष * ॲड.रामचंद्र खोबराजी बागल
* सदस्य-मंत्री * ईश्वरराव नारायणराव भोसीकर

-: प्रधान कार्यालय :-
डॉ. राजेंद्र प्रसाद रोड, हिंगोली गेट जवळ, नांदेड - 431601 (महाराष्ट्र)
02462-242573 Fax No. : 242573 email id: mkgsnnd@gmail.com,mkgsckvnnd@gmail.com

जावक क्रमांक :– २०२६–२७ दिनांक :– ०१/१०/२०२६



**खादीवर भव्य सुट**

मराठवाडा खादी ग्रोमोद्योग समितीच्या सर्व प्रमाणित खादी भांडारातून २ ऑक्टोबर २०२६ ते १४ नोव्हेंबर २०२६ दिपावलीपर्यंत संस्थेने सुट देण्याचे निश्चित केले आहे. मराठवाड्यातील सर्व भांडारातून खालीलप्रमाणे खादी माल उपलब्ध आहे. त्याचप्रमाणे विविध डिझाईनमध्ये शर्टस व आकर्षक वस्तुंचा मोठ्या प्रमाणात स्टॉक उपलब्ध आहे.

तरी सर्व खादी ग्राहकांनी सुट सवलतीचा लाभ घ्यावा ही विनंती.

| खादी प्रकार | विवरण | संस्था सुट | रिबेट कालावधी |
|---|---|---|---|
| सुती खादी व पॉलीवस्त्र | खादी शर्टींग सतरंजी, आसन पट्टी, बेडशिट, टॉवेल, लुंगी, साडी, धोती, ई. | २०% | २ ऑक्टो–२०२६ ते १४ नोव्हें–२०२६ |
| रेशम | शर्टींग रेडिमेड शर्टस्, नेहरू शर्ट ई. | २०% | ----//---- |
| उलन | उलन, निळी कोटींग ई. | २०% | ----//---- |
| रेडिमेड | शर्टस्, पायजामा, बनियन नेहरू शर्ट. ई. | ३५% | ----//---- |
| ग्रामोद्योग | मध, मंजन, अगरबत्ती, साबन, ऑक्साईड मुर्ती व शॉम्पू | सुट नाही | |

विनीत

श्री डॉ. हंसराज वैद्य, अध्यक्ष — श्री रामचंद्र बागल, उपाध्यक्ष — श्री ईश्वरराव भोसीकर, सचिव/विश्वस्त

खादी ग्रामोद्योग भवन, हनुमान पेठ वजिराबाद नांदेड, संपर्क – ९४२१८४०८३०

खादी ग्रामोद्योग भवन, स्टेट बँकेजवळ मेन रोड कंधार, संपर्क – ९५२९७४७८८०





# नांदेड परिक्षेत्रात अवैध धंद्यांवर मोठी कारवाई; महिनाभरात १६०७ गुन्हे, २१ कोटींचा मुद्देमाल जप्त

**नांदेड (प्रतिनिधी)–** पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांच्या मार्गदर्शनाखाली नांदेड परिक्षेत्रात १ ते ३० सप्टेंबर २०२६ दरम्यान राबविण्यात आलेल्या 'अवैध व्यवसाय निर्मूलन मोहीम–३' अंतर्गत मोठी कारवाई करण्यात आली आहे. या मोहिमेत नांदेड, परभणी, हिंगोली आणि लातूर या चारही जिल्ह्यांमध्ये एकूण १६०७ गुन्हे दाखल करून २५९६ इसमांविरुद्ध कारवाई करण्यात आली असून २१ कोटी २१ लाख ८७ हजार ८२५ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

या मोहिमेअंतर्गत गुटख्याविरोधात भारतीय न्याय संहिता कलम १२३ अंतर्गत ३१ गुन्हे दाखल करून १ कोटी ३५ लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. यासह मटका–जुगाऱ्यांविरोधात महाराष्ट्र जुगार कायद्यांतर्गत २९७ गुन्हे दाखल करून २ कोटी ५३ लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे आणि अवैध दारूविरोधात महाराष्ट्र दारूबंदी कायद्यान्वये ९७८ गुन्हे दाखल करून १६ कोटी ७३ लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. शस्त्र अधिनियमाअंतर्गत व इतर कायद्याअंतर्गत ३०१ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

या कारवाईत पोलीस उपमहानिरीक्षक कार्यालयातील विशेष पथकासह चारही जिल्ह्यांचे पोलीस अधीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा आणि पोलीस ठाण्याच्या अधिकारी व अंमलदारांनी सहभाग घेतला. विशेष पथकाने नांदेड, परभणी, हिंगोली व लातूर जिल्ह्यात मटका, जुगार व गुटख्याविरुद्ध स्वतंत्र कारवाया केल्या आहेत.

नांदेड परिक्षेत्रात १ ऑक्टोबरपासून 'अवैध व्यवसाय निर्मूलन मोहीम–४' राबविण्यात येणार आहे. या मोहिमेत गुटखा, मटका–जुगार, अवैध दारू, अंमली पदार्थ, अवैध वाळू उपसा व वाहतूक, वेश्या व्यवसाय, जीवनावश्यक वस्तू अधिनियम, अवैध प्रवासी वाहतूक आदींविरुद्ध संपूर्ण ऑक्टोबर महिनाभर व्यापक व कठोर कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी दिली आहे.

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन
संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ
गोदातीर समाचार
संपादक
केशव घोणसे पाटील

# गांधींच्या आत्मनिर्भर भारताचा शोध अजूनही सुरूच!

महात्मा गांधी यांची जयंती आली की त्यांच्या विचारांची आठवण होते. त्यांच्या प्रतिमेला अभिवादन केले जाते, स्वच्छतेचे संदेश दिले जातात आणि 'आत्मनिर्भर भारत'पासून ग्रामस्वराज्यापर्यंत गांधीजींच्या विचारांचा गौरव केला जातो. पण गांधीजींच्या निधनाला ७८ वर्षे उलटून गेल्यानंतर एक मूलभूत प्रश्न विचारण्याची वेळ आली आहे की, ज्या भारताचे स्वप्न गांधीजींनी पाहिले होते, त्या दिशेने आपण खरोखर किती पुढे आलो? ३० जानेवारी १९४८ रोजी गांधीजींची हत्या झाली. त्यावेळी भारत नुकताच स्वतंत्र झाला होता. गरिबी, निरक्षरता, बेरोजगारी, रोगराई, औद्योगिक मागासलेपणा आणि सामाजिक विषमता अशी असंख्य आव्हाने देशासमोर होती. आजचा भारत त्या भारतापेक्षा निश्चितच वेगळा आहे. विज्ञान-तंत्रज्ञान, अवकाश संशोधन, माहिती-तंत्रज्ञान, पायाभूत सुविधा, औद्योगिक उत्पादन, डिजिटल व्यवहार, शिक्षण आणि आरोग्य क्षेत्रात देशाने मोठी झेप घेतली आहे. भारताची अर्थव्यवस्था जगातील प्रमुख अर्थव्यवस्थांमध्ये स्थान मिळवण्याच्या दिशेने पुढे सरकत आहे. अवकाशात उपग्रह पाठविण्यापासून डिजिटल पद्धतीने काही सेकंदांत आर्थिक व्यवहार करण्यापर्यंतचा प्रवास नक्कीच अभिमानास्पद आहे. मात्र विकासाचा हा वेग गांधीजींच्या विचारांच्या कसोटीवर तपासला तर चित्र तितके सरळ दिसत नाही. गांधीजींच्या 'आत्मनिर्भरते'चा अर्थ केवळ परदेशी वस्तूंवर बहिष्कार घालणे एवढाच मर्यादित नव्हता. स्वदेशी ही त्यांच्यासाठी आर्थिक संकल्पना असण्याबरोबरच सामाजिक आणि नैतिक भूमिका होती. देशातील उत्पादन वाढावे, स्थानिक उद्योगांना चालना मिळावी, रोजगार निर्माण व्हावा आणि सामान्य माणसाचे आर्थिक स्वातंत्र्य बळकट व्हावे, अशी त्यांची अपेक्षा होती. आज 'आत्मनिर्भर भारत' हा शब्द लोकप्रिय झाला आहे; परंतु त्याचा अर्थ स्वदेशी उत्पादन वाढविण्यापासून स्थानिक रोजगारनिर्मितीपर्यंत आणि आर्थिक विषमता कमी करण्यापर्यंत किती व्यापकपणे स्वीकारला गेला आहे, हा खरा प्रश्न आहे. गांधीजींनी 'खेड्याकडे चला' असे सांगितले. त्यांना भारताचा विकास हा गावांच्या विकासातून व्हावा, असे वाटत होते. पण तसे झाले नाही. रोजगार, शिक्षण, आरोग्य आणि चांगल्या संधींच्या शोधात ग्रामीण भागातील तरुण शहरांकडे स्थलांतरित होत आहेत. अनेक गावांमध्ये शेती हा एकमेव आधार राहिला आहे, तर शहरांवर लोकसंख्येचा प्रचंड ताण वाढत आहे. महानगरे फुगत असताना ग्रामीण अर्थव्यवस्था अनेक ठिकाणी कमकुवत होत आहे. ही परिस्थिती गांधींच्या ग्रामस्वराज्याच्या कल्पनेशी कितपत सुसंगत आहे? देशाने औद्योगिक प्रगती केली, पण त्याचवेळी छोट्या उद्योगांसमोरील अडचणी संपल्या का? मोठ्या उद्योगांनी रोजगार आणि संपत्ती निर्माण केली असली तरी संपत्तीचे केंद्रीकरण वाढत नाही ना, हा प्रश्नही विचारावा लागेल. गांधीजींच्या आर्थिक विचारांच्या केंद्रस्थानी सामान्य माणूस होता. आज विकासाचा फायदा समाजातील शेवटच्या घटकापर्यंत कितपत पोहोचतो, याचे प्रामाणिक मूल्यमापन आवश्यक आहे. परकीय वस्तूंच्या बाबतीतही परिस्थिती विरोधाभासी आहे. स्वदेशीचा आग्रह असूनही भारतीय बाजारपेठेत अनेक परदेशी उत्पादनांचे वर्चस्व आहे. विशेषतः स्वस्त वस्तूंच्या बाबतीत ग्राहक किंमत आणि गुणवत्ता यांचा विचार करतो. त्यामुळे केवळ 'देशी वस्तू खरेदी करा' असे आवाहन करून प्रश्न सुटणार नाही. देशी उत्पादन स्वस्त, दर्जेदार आणि सहज उपलब्ध करण्यासाठी उत्पादनक्षमता, तंत्रज्ञान, संशोधन, कौशल्य आणि वितरणव्यवस्था मजबूत करावी लागेल. देशभक्तीच्या भावनेवर बाजारपेठ चालत नाही; सक्षम अर्थव्यवस्था उभी करावी लागते. गांधीजींच्या दृष्टीने आत्मनिर्भरता म्हणजे प्रत्येक व्यक्तीला सन्मानाने जगण्याची क्षमता मिळणे. रोजगार, शिक्षण, आरोग्य, अन्न, निवारा आणि सामाजिक न्याय या मूलभूत गरजा पूर्ण झाल्याशिवाय आर्थिक आत्मनिर्भरतेचा दावा अपुरा ठरतो. म्हणूनच देशाची आर्थिक प्रगती मोजताना केवळ सकल देशांतर्गत उत्पादन, मोठे महामार्ग किंवा वाढती डिजिटल अर्थव्यवस्था पुरेशी नाही. सामान्य नागरिकाचे जीवनमान किती सुधारले, ग्रामीण युवकाला रोजगार मिळाला का, शेतकरी सुरक्षित झाला का आणि विषमता कमी झाली का, हेही तितकेच महत्त्वाचे आहे. गांधीजींनी स्वावलंबनाबरोबरच संयम, साधेपणा, विकेंद्रीकरण, श्रमाची प्रतिष्ठा आणि नैतिक अर्थव्यवस्थेचा पुरस्कार केला. आजच्या उपभोगवादी संस्कृतीत या विचारांना किती स्थान आहे? अधिकाधिक उत्पादन, अधिकाधिक उपभोग आणि अधिकाधिक नफा ही विकासाची सूत्रे होत असताना पर्यावरणाचा ऱ्हास आणि संसाधनांचा अमर्याद वापर वाढत नाही का? म्हणूनच गांधीजींच्या विचारांचे मूल्यमापन पुतळ्यांना हार घालून किंवा जयंतीनिमित्त भाषणे करून होणार नाही. भारताने प्रगती केली आहे, यात शंका नाही; पण ही प्रगती गांधींच्या मार्गाने झाली की गांधींच्या मार्गापासून दूर जाऊन झाली, हा अधिक महत्त्वाचा प्रश्न आहे. आत्मनिर्भर भारताची घोषणा आकर्षक आहे. पण तिच्यामागे गाव, शेतकरी, कामगार, लघुउद्योजक, युवक आणि सामान्य ग्राहक यांना केंद्रस्थानी ठेवणारे दीर्घकालीन नियोजन नसेल तर 'आत्मनिर्भरता' हा केवळ भावनिक घोषवाक्य ठरेल. गांधीजींची खरी आठवण त्यांच्या जयंतीपुरती मर्यादित ठेवायची नसेल तर त्यांच्या विचारांशी असलेला आपला संबंध नव्याने तपासावा लागेल. भारत महासत्ता होण्याचे स्वप्न पाहत असताना भारतातील शेवटचा माणूस आत्मसन्मानाने, स्वावलंबीपणे आणि सुरक्षितपणे जगतो आहे का? या प्रश्नाचे उत्तरच गांधींच्या भारताच्या दिशेने आपण किती पुढे आलो, याचे खरे मोजमाप ठरेल.

# महात्मा गांधी : समाजहितविषयक दृष्टीकोण



संपूर्ण जग जेव्हा साम्राज्यवादाच्या विळख्यात अडकले होते तेव्हा जुलमी ब्रिटिशांना सत्याग्रह, असहकार, सविनय कायदेभंग इत्यादी अभिनव शस्त्राने लढा देणारे, पूजनीय व्यक्तिमत्व म्हणजे महात्मा गांधी .

गांधीजी सारखा हाडामासाचा माणूस प्रत्यक्ष जिवंत व कार्यरत होता या गोष्टीवर पुढील पिढ्यांचा विश्वास बसणार नाही असे विज्ञान महर्षी आईन्स्टाईन यांचे मत आहे.महात्मा गांधींचा जन्म २ ऑक्टोबर १८६९ रोजी झाला आणि संपूर्ण भारताच्या इतिहासाला नवी दिशा मिळाली. महात्मा गांधींवर टॉलस्टॉय ,रस्किन ,गोखले इत्यादी विचारवताचा प्रभाव होता. त्याचबरोबर गीता, कुराण आणि बायबल इत्यादी धर्मग्रंथाचाही प्रभाव होता. स्वातंत्र्यासाठी कायदेशीर व शांततापूर्ण मार्ग हाच योग्य मार्ग आहे या तत्त्वाचा जन्मभर अग़ीकार त्यांनी केला .रस्किन यांच्या अन् टू दी लास्ट या ग्रंथातूनच त्यांनी अंत्योदय व सर्वोदय या विचारांची प्रेरणा घेतली  त्याच ग्रंथातील समाजाचे कल्याण व्यक्तीचेही भले करून जाते या शिकवणुकीचा त्यांच्या मनावर मोठा परिणाम झाल्याचे ते म्हणतात .तसेच सर्वात जास्त त्यांच्यावर टॉलस्टॉय या विचारवंताच्या प्रभाव होता टॉलस्टॉय यांच्या दि गॉड विदिन यू या ग्रंथामुळेच त्यांनी आत्म्याच्या आवाजासंबंधी विचार मांडले आहेत .

अन टू द लास्ट या रस्किनच्या ग्रंथाच्या गुजराती अनुवादाला महात्मा गांधीजींनी सर्वोदय हे नाव दिले त्यात सर्वांचा उदय अभिप्रेत आहे तसेच यात एकाचा उदय हा दुसऱ्याचा असतोच असे नाही जास्तीत जास्त व्यक्तींचे जास्तीत जास्त हित हा उपयुक्ततावादी सिद्धांत या संकल्पनेच्या मुळाशी आहे. महात्मा गांधींच्या मते जे अर्थशास्त्र दुर्बलांचे शोषण करून पिळवणूक करून संपत्ती कमवा शिकवते ते अर्थशास्त्र मला मान्य नाही सर्वोदयाची संकल्पना मांडताना सर्वोदय संकल्पनेची मूलतत्त्वे सुद्धा महात्मा गांधी यांनी मांडलेली दिसून येतात.

१) एका व्यक्तीचे अधिकतम हित साधण्यापेक्षा सर्व व्यक्तीचे अधिकतम हित साधने हे सर्वोदयाचे मूळ आहे.

२) यात संपूर्ण समाजाच्या उत्कर्षावर भर दिला आहे.
सर्वोदय ही विश्वव्यापी संकल्पना आहे

३)सर्वोदय संकल्पनेत आर्थिक व राजकीय शक्तीच्या विकेंद्रीकरणावर भर दिला जातो. उत्पन्नाच्या सर्वच साधनांचे विकेंद्रीकरण झाले पाहिजे असे महात्मा गांधींचे मत होते.

४)सर्वोदयाची संकल्पना मांडताना महात्मा गांधी म्हणतात गरीब मध्यमवर्गीय ग्रामीण लोकांचे हित संवर्धन व सत्तेचे विकेंद्रीकरण यावर भर दिला जातो.

भारतीय समाजातील विविध समस्यांचे निराकरण करण्यासाठी महात्मा गांधीजींनी सर्वोदयाची संकल्पना मांडताना तेरा कलमी कार्यक्रम हाती घेतला होता.

महात्मा गांधींच्या मते अस्पृश्यता हिंदू धर्मातील कलंक आहे तो दूर झाला पाहिजे म्हणूनच अस्पृश्यता या शब्दासाठी त्यांनी हरिजन हा पर्यायी शब्द रूढ केला. सुवर्ण, हिंदू एवढेच हरिजन यांना सुद्धा सार्वजनिक जीवनात राजकीय, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक हक्क असले पाहिजेत असे महात्मा गांधी म्हणत. त्यासाठी त्यांनी हरिजन सेवक संघाची स्थापना केली व हरिजन नावाचे साप्ताहिक ही चालवले ज्याच्या माध्यमातून समाजातील सर्व घटकांना न्याय देण्याचा प्रयत्न त्यांनी केला. पुढे महात्मा गांधी म्हणतात भारतीय समाज हा बहुजनसी स्वरूपाचा आहे आणि त्यामुळे सर्वधर्मसमभाव तत्वाचा पुरस्कार त्यांनी केला. वेद, कुराण, बायबल, गीता हे ग्रंथ वेगवेगळे असले तरी त्यातील निर्माण करता, पालन करता एकच आहे तो म्हणजे परमेश्वर. ईश्वराची प्रार्थना एकच आहे याचा अर्थ त्यांच्या मते प्रत्येक धर्मात समान धागा आहे आणि त्याच धाग्याचा वापर करून भारतातील सर्वधर्म, जाती, उपजाती, स्त्री-पुरुष, मागास, दलित, पददलित, गिरिजन इत्यादींना एकत्र आणून त्यांच्यात ऐक्य साधले पाहिजे.

महात्मा गांधी हे मुळातच व्यसनांच्या विरोधात होते .दारूला त्यांनी कडाडून विरोध केला .त्यांच्या मते दारूमुळे केवळ आर्थिक नुकसानच होते असे नाही तर शरीराची हानी होते, मनुष्य मानसिक  दृष्ट्या खचून जातो, कौटुंबिक कलह निर्माण होतात,  सर्व प्रकारच्या मूल्यांचा ऱ्हास होतो ,तसेच समाजात निंदानालस्ती होते .त्याचबरोबर यंग इंडिया नावाच्या वर्तमानपत्रातील एका लेखात त्यांनी एकदा असे लिहिले होते की, मला जर कोणी एका तासासाठी भारताचा हुकूमशहा म्हणून नेमले तर भारतातील सर्व दारूची दुकाने बंद करेन

पुढे ते यंग इंडिया नावाच्या वर्तमानपत्रात म्हणतात, आपण जर परदेशी कपड्यान ऐवजी खादी वापरली तर अनेकांच्या हाताला काम मिळेल देशातील उद्योगाला बळकटी मिळेल आणि त्यामुळे परदेशात जाणारा आपला पैसा देशातच पुनर्वापर करता येईल म्हणून त्यांनी खादीचा वापर करण्यासाठी  जनतेकडे आग्रह धरला कारण ब्रिटिशांनी अगोदरच भारताची मोठ्या प्रमाणात लूट केली होती त्यामुळे भारत कंगालच झाला होता तसेच बेकारी भारतात मोठ्या प्रमाणात निर्माण झाली होती आणि त्यामुळे दारिद्र्य आले होते आणि यावर जर आपल्याला उपाय करायचा असेल तर स्वदेशीचा वापर आणि त्यात वेगवेगळ्या उद्योगधंद्याला चालना हा महात्मा गांधींचा उद्देश होता .

ब्रिटिशांच्या काळात यांत्रिकरणामुळे भारतातील लघुउद्योग, कुटीर उद्योग टिकाव धरू शकले नाहीत त्यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्था कोसळली व ग्रामीण भाग दारिद्र्याच्या विळख्यात अडकला आणि त्यामुळे महात्मा गांधींनी ग्राम उद्योगावर भर देण्यास सांगितले त्यासाठीच त्यांनी स्वदेशीचा आग्रह धरला. श्रमाची प्रतिष्ठा लोकांना पटवून दिली आणि बेकारी व दारिद्र्यावर रामबाण इलाज सांगितला. भारत खेड्यांचा देश असल्यामुळे भारतातील नियोजन ग्रामीण भागाला अनुसरून असावे यासाठी आवश्यक ते मार्गदर्शन करणे एवढेच कार्य केंद्रीय सत्तेने करावे मोठे मोठे उद्योगांकडे संपत्तीचे केंद्रीकरण होते आणि त्यामुळे गरिबांच्या समुद्रात श्रीमंताची बेटे निर्माण होतात याच कारणामुळे महात्मा गांधींनी ग्राम नियोजनाचा पुरस्कार केला इतका उदात्त दृष्टिकोन ग्रामविकासांचा महात्मा गांधींचा होता.

भारतातील सर्व  समस्यांचे मूळ निरक्षरता आहे हे महात्मा गांधी जाणून होते त्यामुळे त्यांनी साक्षरतेसाठी आग्रह धरला .महात्मा गांधींना बंदिस्त शिक्षण व पाठ्यपुस्तकातून दिले जाणारे पोपटपंची शिक्षण मान्य नव्हते तर त्यांना नई तालीम ही शिक्षण पद्धती अपेक्षित होती या शिक्षण पद्धतीत नाविन्यपूर्ण व्यावसायिक शिक्षण, उद्योग , स्वयंरोजगार या संदर्भात त्यांनी सखोल विवेचन केले आहे. ज्या शिक्षणातून व्यक्तीचा नैतिक ,मानसिक, बौद्धिक आणि शारीरिक विकास होतो ती शिक्षण प्रणाली सर्वोत्तम होय असे महात्मा गांधीचे स्पष्ट मत होते . डळींशीरलू ळी पीं ींहश शपव`ष शर्वीलरींळेप पीं शींशप ींहश लशसलळपलस लू शर्वीलरींळेप, ख ाशरप वीरुळपस`ीं`ष ींहश लशींीं ळप ाप लेवू ाळपव रपव `ळिीळीं शिक्षणातून श्रमाला प्रतिष्ठा मिळेल तसेच स्वावलंबन, ज्ञानार्जन, उद्योग, निरीक्षण  या बाबी साध्य होतील  त्याचबरोबर भारतात तत्कालीन समाज व्यवस्थेत मोठ्या प्रमाणात निरक्षरता होती समाजातील फार मोठ्या घटकाला  शिक्षणाचा गंधही नव्हता आणि त्यामुळे सावकार ,जमीनदार इत्यादी लोक त्याचा फायदा घेत होते .म्हणून महात्मा गांधी म्हणत म्हणतात की, शोषित पीडित जनतेला यातून कायमचे मुक्त करायचे असेल  तर प्रौढशिक्षणाला पर्याय नाही प्रौढ शिक्षणातून लोकांच्या जाणिवा विकसित होतात ,आजूबाजूच्या जगाकडे खुल्या नजरेने बघण्याची दृष्टी निर्माण होते आणि त्यासाठी प्रौढशिक्षणाचा आग्रह त्यांनी धरला होता .

महात्मा गांधी पुढे म्हणतात स्त्री-पुरुष जीवनरुपी व समाज रुपी रथाच्या दोन बाजू आहेत म्हणूनच एकाशिवाय दुसऱ्याचे अस्तित्व संपुष्टात येते याच कारणामुळे ते  नेहमी म्हणत की समाजाचा परिपूर्ण विकास करायचा असेल तर समाजातील अर्ध्या असणाऱ्या स्त्रियांकडे दुर्लक्ष करून चालणार नाही .ते स्त्री पुरुष समानतेच्या तत्त्वाचे पुरस्कार होते . ते स्त्री पुरुष समानतेचे तत्व मांडताना ते म्हणतात पती जर देव असेल तर पत्नी देवता आहे. तिला समान हक्क, ती पतीची सहचरणि सखी, स्नेही प्रसंगी गुरु आणि सल्लागार आहे. महात्मा गांधींना स्त्री पुरुष नैसर्गिक भेद अपेक्षित आहे परंतु ते पुढे म्हणतात, स्त्रियांनी स्व विकासासाठी चूल सोडावी, चुलीच्या रक्षणाकरीता खांद्यावर बंदूक घ्यावी त्याचबरोबर निर्भयता, धैर्य स्वतः मध्ये निर्माण करावे बाह्य घटकांकडून होणारी पिळवणूक थांबवावी, स्वसंरक्षणासाठी आत्मबल वाढवावे आणि पुरुष व समाजाच्या गुलामगिरीतून स्वतःची मुक्तता करून घ्यावी. समाजाची प्रगती साधायची असेल तर जरठकुमारी विवाह, बहुपत्नीत्व, हुंडा पद्धती, स्त्रीभ्रूणहत्या हत्या इत्यादी चालीरीतीना कायमची मूठमाती द्यावी लागेल आणि स्त्री उन्नती साधायची असेल तर स्त्रीला शिक्षणाशिवाय पर्याय नाही. ते पुढे म्हणतात, समाजाला शिक्षित करायचे पण समाजाच्या प्रत्येक स्तरापर्यंत जर शिक्षण पोहोचवायचे असेल तर समाजातील लोकभाषेचा वापर होणे गरजेचे आहे तरच सर्वांना शिक्षण घेणे यामुळे शक्य होणार आहे. त्यामुळे इंग्रजीसारखी परकीय भाषा ज्ञानभाषा म्हणून लादणे हे योग्य होणार नाही.

महात्मा गांधींना आर्थिक, सामाजिक, धार्मिक अशा कोणत्याही क्षेत्रात विषमता मान्य नव्हती. सर्वोदय म्हणजे सर्वांचा विकास असे त्यांचे ध्येय होते. सर्वोदय समाजातील सर्वांचे कल्याण हे तत्व आर्थिक समानतेशिवाय साध्य होणार नाही हे समजून त्यांनी विश्वस्ताची संकल्पना मांडली. कारण व्यक्तीचा सर्वांगीण विकास होण्यासाठी आर्थिक बाबतीत योग्य संधी समानतेच्या आधारावरच प्राप्त होणे आवश्यक आहे. आशा या महान विश्ववंदनीय महामानवास, मानवतेच्या व आयुष्याच्या पूजाऱ्यास जयंतीनिमित्त मानाचा मुजरा!

**-डॉ. सत्यभामा जाधव**
सदस्य बाल कल्याण समिती
नांदेड
मो. ९४०३७४४७१५

# स्वच्छतेपलीकडचा निर्मळ माणूस

ग्रामविकासाच्या वाटेवर आयुष्यभर चाललेला स्वच्छतादूत  माधवराव पाटील शेळगावकर आज आपल्यात नाहीत, ही मोठी खंत आहे. काही माणसे एखाद्या पदामुळे मोठी होत नाहीत; तर आपल्या कार्यामुळे एखाद्या पदालाच मोठेपण प्राप्त करून देतात. काही व्यक्ती एखाद्या चळवळीचे नेतृत्व करतात; तर काहींच्या जाण्यानेच त्या चळवळीला पोरकेपणाची जाणीव होते. माधवराव पाटील शेळगावकर हे अशाच दुर्मीळ व्यक्तिमत्त्वांपैकी एक होते. १ ऑक्टोबर २०२६ रोजी त्यांच्या निधनाची बातमी मनाला चटका लावून गेली. स्वच्छता चळवळ, ग्रामविकास आणि परिवर्तनवादी विचारांशी आयुष्यभर नाते जोडून राहिलेला हा कर्मयोगी आज आपल्यात नाही, ही जाणीवच अस्वस्थ करणारी आहे. त्यांच्या निधनाने एका व्यक्तीचे नव्हे, तर स्वच्छता आणि ग्रामविकासाच्या चळवळीतील एका जिवंत विचाराचे मोठे नुकसान झाले आहे.

'संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान' म्हटले की, महाराष्ट्रातील ग्रामविकासाच्या क्षेत्रात माधवराव पाटील शेळगावकर यांचे नाव आदराने घेतले जाते. स्वच्छता म्हणजे केवळ रस्ते झाडणे, कचरा उचलणे किंवा गाव सुंदर ठेवणे एवढ्यापुरता त्यांचा विचार कधीच मर्यादित नव्हता. त्यांच्या दृष्टीने स्वच्छता ही सामाजिक परिवर्तनाची पहिली पायरी होती. स्वच्छ गाव, जागरूक नागरिक, निरोगी जीवनशैली, पर्यावरणाचे भान, लोकसहभाग आणि ग्रामविकास यांची त्यांनी सांगड घातली. राज्यस्तरीय ग्रामस्वच्छता समितीचे अध्यक्ष म्हणून काम करताना त्यांनी ग्रामीण महाराष्ट्राच्या अनुभवातून अनेक विचार पुढे नेले. महाराष्ट्रातच नव्हे, तर देशातील विविध मंचांवर त्यांनी ग्रामस्वच्छता व ग्रामविकासाचा विचार मांडला. कोलंबो येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय स्वच्छता परिषदेत सहभाग नोंदविणे, ही त्यांच्या कार्याची व्यापकता दर्शविणारी बाब होती.

त्यांचे 'माझी ग्रामविकासाची शेती' हे आत्मचरित्र म्हणजे केवळ स्वतःच्या जीवनाची कहाणी नाही; ते ग्रामीण समाजजीवन, संघर्ष, ग्रामविकास आणि सामाजिक परिवर्तनाचा एक अनुभवग्रंथ



आहे. शेतकरी कुटुंबातून आलेल्या व्यक्तीने सामाजिक आणि सार्वजनिक जीवनात स्वतःची वाट निर्माण करताना कोणते अनुभव घेतले, कोणत्या अडचणींना सामोरे गेले आणि समाजासाठी काम करताना कोणती मूल्ये जपली, याचे दर्शन या प्रवासातून घडते. या पुस्तकातील अनुभव नव्या पिढीतील सामाजिक कार्यकर्ते आणि सार्वजनिक जीवनात प्रवेश करू इच्छिणाऱ्या तरुणांसाठी निश्चितच अनुभवांची शिदोरी ठरू शकतात. त्यांच्या आयुष्याकडे पाहिले की जाणवते-ग्रामविकास ही त्यांच्यासाठी एखादी योजना नव्हती; तो त्यांच्या जीवनाचा ध्यास होता.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, संत गाडगेबाबा आणि परिवर्तनवादी विचार-सरणीचा त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर ठसा होता. समाजातील अंधश्रद्धा, विषमता, अस्वच्छता आणि अन्याय यांच्याविरुद्ध उभे राहण्याची प्रेरणा त्यांना या विचारपरंपरेतून मिळाली. शेतकरी प्रश्नांशीही त्यांचे घट्ट नाते होते. कै. शरद जोशी यांच्या नेतृत्वाखालील शेतकरी संघटनेच्या माध्यमातून त्यांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी काम केले. या प्रवासात अडचणी आल्या, त्रास सहन करावा लागला; मात्र समाजहितासाठी स्वीकारलेला संघर्ष त्यांनी कधी ओझे मानला नाही.

शेळगाव गौरी हे त्यांचे गाव. या गावाच्या विकासासाठी त्यांनी केलेली धडपड पाहिली की, त्यांनी केवळ गावाचा विकास केला नाही, तर गावाच्या विकासाची नवी कल्पनाच उभी केली, असे म्हणावेसे वाटते. गावाच्या सर्वांगीण उन्नतीचा विचार करताना त्यांनी भौतिक विकासाबरोबरच लोकसहभाग, सामाजिक जाणीव आणि स्वावलंबन यांनाही महत्त्व दिले. म्हणूनच त्यांच्या ग्रामविकासाच्या कामाकडे केवळ एका गावाच्या विकासाच्या चौकटीत पाहता येत नाही. ते ग्रामीण विकासाच्या व्यापक प्रयोगाचा भाग होते.

माधवराव पाटील शेळगावकर यांची वाणी प्रभावी होती. पण त्या प्रभावीपणाला आक्रमकतेची किनार नव्हती. विचार ठाम, भाषा संयमी आणि माणसांविषयी आदर हे त्यांच्या संवादाचे वैशिष्ट्य होते. एखादा विषय कसा मांडावा, मुद्दा कसा पटवून द्यावा आणि मतभेद असतानाही समोरच्या व्यक्तीचा सन्मान कसा राखावा, याचा वस्तुपाठ त्यांच्या संवादातून मिळत असे. त्यांच्या बोलण्यात द्वेष नव्हता, कटुता नव्हती. विषमताजन्य विचार आणि जातीय संकुचितपणापासून दूर राहून त्यांनी माणुसकी, समता आणि संवादाचा मार्ग स्वीकारला.म्हणूनच ते केवळ चांगले वक्ते नव्हते; ते संवादाचे महामेरू होते.

माधवराव पाटील शेळगावकर यांच्यात विचारांची खोली, संघटनकौशल्य, ग्रामीण प्रश्नांची जाण आणि संवादाची ताकद होती. सार्वजनिक जीवनात त्यांच्या कार्याचा आवाका पाहता, त्यांना राज्याच्या व्यापक राजकीय-सामाजिक क्षेत्रात आणखी मोठी भूमिका मिळाली असती, असे त्यांच्या कार्याचा परिचय असणाऱ्या अनेकांना वाटत राहिले.परंतु पद मिळाले किंवा नाही, यापेक्षा त्यांनी माणसांच्या मनात निर्माण केलेले स्थान अधिक महत्त्वाचे ठरते. त्यांच्या कार्याचा खरा गौरव पदांमध्ये नव्हे, तर त्यांनी जागवलेल्या सामाजिक जाणिवेत आहे.

ग्रामविकास आणि स्वच्छता क्षेत्रातील त्यांच्या कार्याची दखल विविध स्तरांवर घेतली गेली. महात्मा गांधी तंटामुक्त गाव पुरस्कार, केंद्र सरकारचा यशवंत पंचायत राज समृद्ध ग्राम पुरस्कार तसेच राष्ट्रपती श्रीमती प्रतिभादेवीसिंह पाटील यांच्या हस्ते पर्यावरण संतुलित समृद्ध ग्राम पुरस्कार अशा गौरवांनी त्यांच्या कार्याला सन्मान मिळाला. मात्र पुरस्कार हे त्यांच्या कार्याचे अंतिम मोजमाप नव्हते. त्यांची खरी कमाई होती गावागावांत निर्माण झालेली स्वच्छतेची जाणीव आणि ग्रामविकासाच्या कामाला मिळालेली प्रेरणा.

माधवराव पाटील हे केवळ धडपडणारे कार्यकर्ते नव्हते. ते चिंतनशील होते. ध्यानसाधनेतही रमणारे होते. कर्म, चिंतन आणि साधना यांचा सुंदर संगम त्यांच्या व्यक्तिमत्त्वात जाणवत असे. माउंट अबू येथील ग्रामविकास परिषदेत त्यांनी मांडलेले विचार असोत किंवा विविध व्यासपीठांवरील त्यांचे भाषण त्यांच्या विचारांत अनुभवाची खोली आणि जीवनाकडे पाहण्याची सकारात्मक दृष्टी जाणवत असे. त्यांच्या चेहऱ्यावरची प्रसन्नता ही त्यांच्या अंतर्मनाच्या निर्मळतेची जणू साक्षच वाटायची.

माझी आणि माधवराव पाटील शेळगावकर यांची भेट काही सार्वजनिक कार्यक्रमांतून झाली. वयाने आणि ज्ञानाने मोठ्या असलेल्या या व्यक्तिमत्त्वाविषयी मनात स्वाभाविकच आदर होता. त्यामुळे त्यांच्याशी फार जवळीक निर्माण करण्याचे धाडस झाले नाही.पण अंतर असूनही मनातला आदर मात्र कायम राहिला. प्रत्येक भेटीत त्यांच्या बोलण्यातून ग्रामविकासाची तळमळ, स्वच्छतेविषयीची बांधिलकी आणि माणसांविषयीची आपुलकी जाणवत असे. समोरच्या व्यक्तीला आदराने संबोधणे, त्याचे म्हणणे शांतपणे ऐकून घेणे आणि त्याच्याशी सन्मानाने संवाद साधणे, हा त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा सहज भाग होता.

आज त्यांच्या निधनाची बातमी समोर आली आणि त्या छोट्या-छोट्या भेटींच्या आठवणी अधिक मोठ्या वाटू लागल्या. काही व्यक्तींशी आपली जवळीक किती होती, यापेक्षा त्यांच्या व्यक्तिमत्त्वाने आपल्या मनावर किती ठसा उमटवला, हे अधिक महत्त्वाचे असते. त्यांच्या कार्यामुळे त्यांना महाराष्ट्राच्या पातळीवर 'स्वच्छतादूत' म्हणून काम करण्याची संधी मिळाली. त्यांनी त्या संधीचे रूपांतर व्यापक सामाजिक संदेशात केले. स्वच्छता त्यांच्या हातात झाडू नव्हती; ती त्यांच्या विचारांची भाषा होती. गाव स्वच्छ असावे, पर्यावरण निरोगी असावे, माणसांमध्ये परस्पर सन्मान असावा आणि विकासात प्रत्येकाचा सहभाग असावा हा त्यांचा विचार होता. म्हणूनच त्यांचे कार्य स्वच्छतागृहांपासून सुरू होऊन माणसाच्या मानसिकतेपर्यंत पोहोचते.

**आज चळवळ पोरकी झाली आहे...**

आज माधवराव पाटील शेळगावकर आपल्यात नाहीत. त्यामुळे स्वच्छता चळवळीतील एक अनुभवी, अभ्यासू आणि संवेदनशील आवाज हरपला आहे.पण एखाद्या कार्यकर्त्याचे खरे निधन तेव्हा होत नाही, जेव्हा त्याचा देह आपल्यातून निघून जातो. त्याने रुजवलेला विचार संपला तरच त्याच्या कार्याचा अंत होतो. माधवरावांनी रुजवलेली स्वच्छतेची जाणीव, ग्रामविकासाची तळमळ, समतेचा विचार, संवादाची संस्कृती आणि माणुसकीची भूमिका आजही जिवंत आहे. हीच त्यांच्या कार्याची खरी पावती आहे.

आज त्यांच्या स्मृतीसमोर नतमस्तक होताना मनात एकच विचार येतो. गाव स्वच्छ करण्यासाठी झाडू हातात घेणारे अनेक मिळतील; पण माणसांचे मन निर्मळ करण्यासाठी आयुष्य झोकून देणारे माधवराव पाटील शेळगावकर पुन्हा पुन्हा जन्माला येत नाहीत. त्यांनी स्वच्छतेला चळवळ दिली, ग्रामविकासाला दिशा दिली आणि सार्वजनिक जीवनाला माणुसकीची किनार दिली.

नितळ, निर्मळ मनाच्या या स्वच्छतादूताला भावपूर्ण श्रद्धांजली! त्यांच्या स्मृतींना विनम्र अभिवादन.त्यांच्या विचारांना सलाम, आणि त्यांनी दाखवलेल्या स्वच्छ, समतामूलक ग्राम विकासाच्या वाटेवर चालणे हीच त्यांना खरी आदरांजली!

**-पंडित पवळे,**
नांदेड
मो.९८९०२३२९६२

# लालबहादुर शास्त्री यांचा साधेपणा

भारताचे दुसरे पंतप्रधान लालबहादुर शास्त्री म्हणजे साधेपणा आणि महानतेची प्रतिकृती होते. त्यांच्या जीवनातील अनेक प्रसंग प्रेरणादायी आहेत. ते देशाचे पंतप्रधान असतानाची गोष्ट आहे. एके दिवशी ते कापड गिरणी पाहण्यासाठी गेले. त्यांच्याबरोबर गिरणीचा मालक, उच्च अधिकारी व इतर महत्त्वाचे लोक होते. गिरणी पाहिल्यानंतर शास्त्रीजी गिरणीच्या गोदामात गेल्यानंतर त्यांनी साड्या दाखवायला सांगितले. गिरणी मालक आणि अधिकाऱ्याने एकापेक्षा एक सुंदर साड्या त्यांना दाखवल्या.



शास्त्रीजी साड्या पाहून म्हणाले,'साड्या तर खूप सुंदर आहेत, यांची किंमत काय आहे?' 'ही साडी ८०० रुपयांची आहे आणि हिची किंमत एक हजार रुपये आहे,' गिरणी मालकाने सांगितले. ही तर खूप महाग आहे, मला कमी किमतीच्या साड्या दाखवा, शास्त्रीजी म्हणाले. ही लक्षात घेण्यासारखी गोष्ट होती की ही घटना १९६५ ची होती. यावेळी एक हजार रुपयांची किंमत खूप होती. 'बरं, ही पाहा. ही साडी पाचशे रुपयांची आहे आणि ही चारशे रुपयांची,' गिरणी मालक दुसऱ्या साड्या दाखवत म्हणाला. 'अरे बाबा, यादेखील खूप महाग आहेत. माझ्यासारख्या गरिबासाठी कमी किमतीच्या साड्या दाखवा, ज्या मी खरेदी करू शकेल,' शास्त्रीजी म्हणाले. 'वा सरकार, आपण तर आमचे पंतप्रधान आहात, तुम्हाला गरीब कसे म्हणता येईल? आम्ही तर या साड्या तुम्हाला भेट देत आहोत,' गिरणी मालक बोलला. ' नाही बाबा, मी भेट घेऊ शकत नाही', शास्त्रीजी म्हणाले. यावर तो गिरणी मालक अधिकाराने म्हणाला की, 'आम्ही आमच्या पंतप्रधानांना भेट देणे, हा आमचा अधिकार आहे.' ' हो, मी पंतप्रधान आहे,' शास्त्रीजी शांतपणे म्हणाले.' परंतु, याचा अर्थ असा नाही की ज्या वस्तू मी खरेदी करू शकत नाही त्या वस्तू मी भेट म्हणून स्वीकारू आणि आपल्या पत्नीला देऊ. मी पंतप्रधान असलो तरी आहे गरीबच ना! तुम्ही मला स्वस्त साड्याच दाखवा. मी ऐपतीप्रमाणेच साडी खरेदी करेन.' गिरणी मालकाच्या साऱ्या विनवण्या व्यर्थ गेल्या. देशाच्या पंतप्रधानांनी स्वस्त भावाच्या साड्याच खरेदी केल्या. शास्त्रीजी एवढे महान होते की मोह त्यांना स्पर्शही करू शकत नव्हता.

लालबहादुर शास्त्री कारागृहात होते. कारागृहात कडक पहारा होता. कोणालाही भेटण्याची अनुमती दिली जात नव्हती. महत् प्रयत्नाने आई रामदुलारी किंवा पत्नी ललितागौरी यांपैकी एकीला भेटण्याची अनुमती मिळाली. लालबहादुर शास्त्री यांच्या पत्नी त्यांना भेटण्यासाठी कारागृहात आल्या, त्या वेळी नाव सांगताच पडताळणी (तपासणी) न करता त्यांना आत सोडण्यात आले. शास्त्रींसोबत गप्पा मारून झाल्यानंतर जातांना त्यांनी लपवून आणलेले दोन आंबे पतीला देऊ केले. त्या शास्त्रींना म्हणाल्या, तुम्हाला आवडतात; म्हणून लपवून आंबे आणले आहेत. शास्त्रीजी म्हणाले, मला अतिशय वाईट वाटले. तू असे करायला नको होतेस. त्यांनी तुझ्यावर विश्वास ठेवून न पडताळता (तपासता) तुला आत सोडले; पण तू त्यांचा विश्वासघात केलास. मला काय आवडते? याचा विचार करण्यापूर्वी मला काय आवडत नाही, याचा विचार तू करायला हवा होतास. कारागृहाचे नियम मोडणे मला आवडणार नाही. ते आंबे परत घेऊन जा. खरी तत्त्वनिष्ठता यालाच म्हणतात.

(संदर्भ : हिंदुजागृती डॉट ऑर्ग)

**-जगन घाणेकर,**
घाटकोपर, मुंबई
मो. ९६६४५५९७८०

# खा. शिवाजीराव काळगे यांच्याकडून पेनूर शिवारातील पीक परिस्थितीची पाहणी



**लोहा (प्रतिनिधी)–** लातूर लोकसभा मतदारसंघाचे खा. शिवाजीराव काळगे हे लोहा तालुक्यातील पीक परिस्थितीची पाहणी करण्यासाठी रविवार, दि. २७ रोजी लोहा दौऱ्यावर असताना त्यांनी जायकवाडी वसाहत परिसरातील पुनर्स्थापित पंचशील धम्म ध्वजास मानवंदना दिली. तसेच पेनूर शिवारातील पीक परिस्थितीची पाहणी केली.

यावर्षी पावसाअभावी मराठ–वाड्यात दुष्काळसदृश्य परिस्थिती निर्माण झाली असून, त्यानुषंगाने लातूर लोकसभा मतदारसंघाचे खा. शिवाजीराव काळगे लोहा दौऱ्यावर होते. प्रारंभी त्यांनी लोहा तालुक्यातील पेनूर शिवारातील पीक परिस्थितीची पाहणी केली. शेतातील खरीप पिके करपून जात आहेत. सरकारने दुष्काळ जाहीर केला. मात्र अनुदान जाहीर केला नाही. शेतकऱ्यांना सरसकट हेक्टरी ५० हजार रुपये अनुदान देण्याची मागणी खा. काळगे यांनी केली. यावेळी माजी जि. प. सभापती संजय पाटील कऱ्हाळे, पेनूरचे सरपंच बाळू पाटील गवते, रामदास पाटील गवते, माधव चांदणे, वसंत गवते, दत्ता गवते, भगवान पाटील गवते, सतीश गवते, संतोष पाटील, रावसाहेब पाटील गावते आदींसह बहुसंख्येने शेतकऱ्यांची उपस्थिती होती.

लोहा शहरातील कंधार रोडस्थित जायकवाडी वसाहत परिसरातील पुनर्स्थापित पंचशील धम्म ध्वजास खा. शिवाजीराव काळगे यांनी मानवंदना दिली. तत्पूर्वी तथागत गौतम बुद्ध व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांचे पूजन करून अभिवादन केले. यावेळी धम्मध्वज रक्षक शिष्टमंडळानी खा. काळगे यांच्याशी पंचशील ध्वज संदर्भात चर्चा करून माहिती देऊन निवेदन सादर केले. खा. काळगे यांनी सदरील ध्वजासंदर्भात लवकरच जिल्हाधिकाऱ्यांशी सविस्तर बोलून तोडगा कसा निघेल यावर सकारात्मक चर्चा करणार असल्याचे शिष्टमंडळास आश्वासित केले.

# पाणीटंचाई निवारणासाठी प्रभावी नियोजन करा -सीईओ महेश पाटील

**नांदेड (प्रतिनिधी)–** दुष्काळसदृश परिस्थिती आणि संभाव्य पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर नागरिकांना आवश्यक शासकीय सेवा तत्परतेने उपलब्ध करून देतानाच पाणीटंचाई निवारणासाठी प्रभावी नियोजन करावे. टंचाई आराखडा हा प्रत्यक्ष परिस्थितीवर आधारित असावा, असे निर्देश जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी महेश पाटील यांनी दिले.

उमरी येथील पंचायत समितीमध्ये नुकतीच मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली तालुकास्तरीय आढावा बैठक घेण्यात आली. यावेळी पंचायत समितीअंतर्गत विविध विभागांचे तसेच ग्रामपंचायतींच्या कामकाजाचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

सद्यस्थितीतील दुष्काळी परिस्थिती लक्षात घेता सर्व विभागांनी संवेदनशीलतेने व जबाबदारीने काम करावे. टंचाई आराखड्यात आवश्यक उपाययोजनांचा समावेश करून त्यांची प्रभावी अंमलबजावणी करावी, अशा सूचना सीईओ महेश पाटील यांनी दिल्या. अधिकारी व कर्मचाऱ्यांनी मुख्यालयी उपस्थित राहून नागरिकांना आवश्यक शासकीय सेवा वेळेत उपलब्ध करून द्याव्यात, असेही त्यांनी स्पष्ट केले.

प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) व इतर घरकुल योजनांतील लाभार्थ्यांच्या अडचणी सोडविण्यासाठी ग्रामीण गृहनिर्माण अभियंता व ग्रामपंचायत अधिकाऱ्यांनी गावनिहाय विशेष शिबिरे आयोजित करावीत. लाभार्थ्यांच्या अडचणी शक्यतो जागेवरच सोडवून घरकुलांची कामे गतिमान करावीत, असे निर्देश त्यांनी दिले.

सेवा संकल्प अभियान तसेच मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान प्रभावीपणे राबवून नागरिकांचा जास्तीत जास्त सहभाग वाढवावा. तालुक्यातील सर्व ग्रामपंचायतींनी मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानात १०० टक्के सहभाग नोंदवावा, अशा सूचनाही त्यांनी दिल्या.

'आपले सरकार सेवा केंद्रा'च्या माध्यमातून नागरिकांना गावातच विविध ऑनलाईन सेवा व आवश्यक प्रमाणपत्रे उपलब्ध करून द्यावीत. नागरिकांना अनावश्यकपणे तालुका कार्यालयात येण्याची वेळ येणार नाही, याची दक्षता घ्यावी. ग्रामपंचायतींचे प्रशासन अधिक पारदर्शक व सक्षम करण्यासाठी सर्व अभिलेखे अद्ययावत ठेवावेत, नोंदी नियमितपणे पूर्ण कराव्यात तसेच शासकीय योजनांच्या अंमलबजावणीत दिरंगाई होणार नाही याची दक्षता घेण्याचे निर्देशही त्यांनी दिले.

या बैठकीस उपमुख्य कार्यकारी अधिकारी डी. बी. गिरी, गट विकास अधिकारी ए. एल. सरोदे यांच्यासह पंचायत समितीचे अधिकारी, विविध विभागांचे तालुकास्तरीय अधिकारी, ग्रामपंचायत अधिकारी व संबंधित कर्मचारी उपस्थित होते. यावेळी विविध योजनांच्या प्रगतीचा आढावा घेऊन आवश्यक त्या सूचना देण्यात आल्या.

## राष्ट्रीय सेवा योजना दिन उत्साहात संपन्न

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)–** सेवादास शिक्षण प्रसारक मंडळ संचलित जवाहरलाल नेहरू समाज कार्य महाविद्यालय व संशोधन केंद्र सिडको नवीन नांदेड येथे २४ सप्टेंबर २६ रोजी राष्ट्रीय सेवा योजना दिनानिमित्त संस्थेचे संस्थापक अध्यक्ष कर्मयोगी डॉ. नानासाहेब जाधव यांच्या प्रेरणेने व कोषाध्यक्ष ॲड. श्रीनिवास जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली उद्‌बोधन वर्ग कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या उद्‌बोधन कार्यक्रमात प्रमुख अतिथी म्हणून राष्ट्रीय सेवा योजनेचे माजी नांदेड जिल्हा समन्वयक प्रा. डॉ. रावसाहेब दोरवे हे उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. नरहरी पाटील हे होते.

याप्रसंगी प्रा. डॉ. मेघराज कपूर डेरिया व प्रा. डॉ. दिलीप काठोडे हे उपस्थित होते.या उद्‌बोधन सत्रात मार्गदर्शन करताना प्रा. डॉ. रावसाहेब दोरवे म्हणाले की, राष्ट्रीय सेवा योजनेद्वारे विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधिलकी, राष्ट्रविकास या गुणांची जोपासना केली जाते. तसेच राष्ट्रीय सेवा योजनेद्वारे विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्त्व विकास, नेतृत्व गुण, कौशल्य इत्यादींचा विकास होतो.

## भारत सरकारच्या ग्रामीण विकास मंत्रालयाचे सहसचिव पी. नरहरी आज नांदेड दौऱ्यावर

**नांदेड (प्रतिनिधी)–** भारत सरकारच्या ग्रामीण विकास मंत्रालयाचे सहसचिव (भू.सं.) पी. नरहरी हे शुक्रवार, दि. २ ऑक्टोबर २०२६ रोजी नांदेड जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत.

सहसचिव पी. नरहरी हे शुक्रवार, दि. २ ऑक्टोबर रोजी सकाळी ७ वाजता हैद्राबाद येथून नांदेडकडे प्रयाण करतील. सकाळी ११ वाजता त्यांचे नांदेड येथे आगमन होईल. त्यानंतर सकाळी ११ ते दुपारी १ या कालावधीत मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या वतीने आयोजित विशेष ग्रामसभेस ते उपस्थित राहतील.

दुपारी १.३० वाजता जेवणासाठी वेळ राखीव ठेवण्यात आला आहे. त्यानंतर दुपारी २ ते ४ या कालावधीत ते जिल्हा प्रशासनाची भेट घेणार आहेत. सायंकाळी ४ वाजता ते नांदेड येथून हैद्राबादकडे प्रयाण करतील.

# राष्ट्रीय पोषण पखवाडा व स्वच्छता पखवाड्याच्या माध्यमातून निरोगी जीवनशैली, स्वच्छता आणि प्लास्टिकमुक्त रेल्वे परिसराचा संदेश

**नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड विभागामार्फत निरोगी जीवनशैली, पोषण, स्वच्छता आणि पर्यावरण संवर्धन याबाबत जनजागृती वाढविण्याच्या उद्देशाने विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. याच अनुषंगाने २६ सप्टेंबर २०२६ रोजी रेल्वे ऑफिसर्स क्लब, मंडल रेल प्रबंधक कार्यालय परिसर, नांदेड येथे ९ वा राष्ट्रीय पोषण पखवाडा साजरा करण्यात आला. तसेच, सध्या सुरू असलेल्या स्वच्छता पखवाड्याअंतर्गत विभागीय रेल्वे रुग्णालय, नांदेड येथे प्लास्टिकमुक्त रेल्वे परिसर आणि प्लास्टिक कचऱ्याच्या योग्य व्यवस्थापनाबाबत विशेष जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आला.



राष्ट्रीय पोषण पखवाड्यानिमित्त श्रीमती प्रंधन्या कामले, अध्यक्षा, दक्षिण मध्य रेल्वे महिला कल्याण संघटना ह्या प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होत्या. डॉ. कमला राणी यांनी सन्माननीय अतिथी म्हणून कार्यक्रमास उपस्थिती लावली.

या कार्यक्रमात SCRWWO च्या सचिव, कोषाध्यक्ष, चंदामामा प्ले स्कूलच्या प्रभारी, शाळेचे कोषाध्यक्ष तसेच इतर सदस्यांसह एकूण १० दक्षिण मध्य रेल्वे महिला कल्याण संघटना सदस्यांनी सहभाग घेतला. याशिवाय सुमारे १५० शालेय विद्यार्थ्यांनी आपल्या पालकांसह उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. ११ शिक्षक आणि ५ सहायक कर्मचारी (काकू) देखील उपस्थित होते.

कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांना व पालकांना संतुलित आहार, पौष्टिक अन्न, निरोगी आहाराच्या सवयी, वैयक्तिक स्वच्छता तसेच मुलांच्या सर्वांगीण आरोग्य आणि विकासाचे महत्त्व याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

या कार्यक्रमास सुमारे ३५० सहभागींची उपस्थिती होती. विद्यार्थी आणि पालकांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे पोषण आणि निरोगी जीवनशैलीचा संदेश अधिक प्रभावीपणे पोहोचला.

स्वच्छता पखवाड्याअंतर्गत मंडल रेल्वे रुग्णालय, नांदेड येथे दिनांक २९ सप्टेंबर रोजी आयोजित जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन मुख्य वैद्यकीय अधीक्षक डॉ. एम. के. श्रीनिवासा यांच्या मार्गदर्शनाखाली व उपस्थितीत करण्यात आले.

यावेळी वरिष्ठ मंडल वैद्यकीय अधिकारी डॉ. मनीषा दुधमले तसेच मंडल वैद्यकीय अधिकारी डॉ. दुर्गा प्रसाद यांच्यासह रुग्णालयातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमात सुमारे २५ ते ३० कर्मचारी व इतर उपस्थितांनी सहभाग घेतला.

## मन्नेरवारलू महासंघाच्यावतीने ४ ऑक्टोबर रोजी नांदेड येथे मार्गदर्शन शिबीर

**नांदेड (प्रतिनिधी)–** राष्ट्रीय आदिवासी मन्नेरवारलू महासंघाच्या वतीने जिल्हा व तालुकानिहाय कार्यकारिणी घोषित करण्याबरोबरच समाजाच्या विविध ज्वलंत प्रश्नांवर मार्गदर्शन करण्यासाठी विशेष मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबीर रविवार, दि. ४ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी १० वाजता नांदेड येथील देवकृपा मंगल कार्यालय, छत्रपती चौक, पूर्णा रोड येथे होणार आहे.

समाजावर होत असलेल्या अन्यायाविरुद्ध आवाज उठवून समाजामध्ये जनजागृती निर्माण करणे, तसेच समाजातील विविध घटकांना संघटित करून त्यांच्या प्रश्नांवर मार्गदर्शन करणे हा या शिबिराचा प्रमुख उद्देश असल्याचे आयोजकांनी सांगितले आहे. यावेळी जिल्हा व तालुकास्तरीय कार्यकारिणी घोषित करण्यात येणार आहे.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राष्ट्रीय आदिवासी मन्नेरवारलू महासंघाचे अध्यक्ष लक्ष्मणराव ठक्करवाड राहणार आहेत. कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक म्हणून महासंघाचे सचिव सुरेशराव अंबुलगेकर, तर विशेष उपस्थिती म्हणून महासंघाचे उपाध्यक्ष मारोतीराव कंठेवाड उपस्थित राहणार आहेत.

कार्यक्रमास महासंघाचे कोषाध्यक्ष नामदेवराव मिठ्ठेवाड, सहसचिव व्यंकटराव सुरेवाड, संचालक बाबुराव पुजरवाड, संचालक दत्तात्रय अन्नमवाड, संचालक मोहनराव गोपुललवाड, संचालक दिलीपराव बास्टेवाड, संचालक नागनाथ अनंतवाड आणि संचालक गंगाधर गिरोड यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

या शिबिरास समाजबांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन नांदेड जिल्हाध्यक्ष मधुकर उन्हाळे आणि नांदेड जिल्हा सचिव यलप्पा कोलेवाड यांनी केले आहे.

**पान १ वरून...**

**ग्रामस्वच्छता चळवळीचे ज्येष्ठ...**

गौरी येथे झाला. बी. ए.पर्यंत शिक्षण घेतलेल्या शेळगावकर यांनी १९६६ ते १९९५ या काळात शेळगाव गौरीचे बिनविरोध सरपंच म्हणून काम पाहिले. १९७९ ते १९९७ या कालावधीत ते नांदेड जिल्हा परिषदेचे सदस्य होते. तसेच १९७४ ते १९९४ या काळात नायगाव कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती म्हणून त्यांनी जबाबदारी सांभाळली.

गोदावरी मनार सहकारी साखर कारखाना, कापूस पणन महासंघ आणि कृषी पणन मंडळाच्या संचालकपदाची जबाबदारीही त्यांनी पार पाडली. विविध संस्थांमधील कामातून त्यांनी ग्रामीण भागातील विकास, शेती आणि शेतकरी हिताच्या प्रश्नांना प्राधान्य दिले.

संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानाला व्यापक लोकचळवळीचे स्वरूप देण्यात शेळगावकर यांचे महत्त्वपूर्ण योगदान राहिले. महाराष्ट्र राज्य ग्रामस्वच्छता अभियानाचे प्रथम अध्यक्ष म्हणून त्यांनी जबाबदारी पार पाडल्यानंतर संपूर्ण महाराष्ट्राचा दौरा केला. आपल्या ओघवत्या आणि विनोदी भाषणशैलीतून त्यांनी ग्रामस्थांमध्ये स्वच्छतेची जाणीव निर्माण केली.

स्वतःच्या शेळगाव गौरी गावातही त्यांनी ग्रामस्थांना सोबत घेत स्वच्छतेची चळवळ उभी केली. घर, गल्ली आणि गाव परिसर स्वच्छ ठेवण्यासाठी लोकसहभाग वाढविला. या प्रयत्नांतून शेळगाव गौरीला ग्रामस्वच्छता अभियानात महाराष्ट्रात द्वितीय क्रमांकाचे स्थान मिळवून देण्यात त्यांचे मोलाचे योगदान राहिले.

गावाचा विकास केवळ मोठ्या साधनसंपत्तीने नव्हे, तर स्वच्छतेची जाणीव, लोकसहभाग आणि सकारात्मक विचारांनीही घडवता येतो, हे त्यांनी आपल्या कार्यातून सिद्ध केले.

दिल्ली तसेच कोलंबो येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय स्वच्छता परिषदांमध्ये त्यांनी सहभाग घेतला. त्यांच्या कार्याची दखल घेत ग्रामस्वच्छता अभियानातील जिल्हा, विभाग आणि राज्यस्तरीय पुरस्कारांसह वसंतराव नाईक जलव्यवस्थापन पुरस्कार, निर्मल ग्राम पुरस्कार, यशवंत पंचायत राज समृद्ध ग्राम पुरस्कार आणि सामाजिक समता पुरस्काराने त्यांचा गौरव करण्यात आला.

गावाला केवळ वास्तव्याचे ठिकाण न मानता, गावाचा विकास आणि पुढील पिढीच्या संस्कारांसाठी आयुष्यभर झटणारे माधवराव पाटील शेळगावकर यांच्या निधनाने शेळगाव गौरीने एक मार्गदर्शक, समाजहितैषी आणि संस्कारक्षम व्यक्तिमत्त्व गमावले आहे.

## नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका कर्मचारी पतसंस्था तज्ज्ञ संचालकपदी गजानन रासे




**नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड मनपाच्या कर्मचारी सहकारी पतसंस्थेच्या तज्ज्ञ संचालकपदी गजानन रामचंद्र रासे यांची निवड करण्यात आली असून, अतिरिक्त आयुक्त गिरीश कदम, उपायुक्त गाढवे व पतसंस्थेचे अध्यक्ष गणेश नागरगोजे आणि संचालक मंडळातील सदस्य सत्यपालसिंघ कोल्हापुरे, साहेबराव जोंधळे, सुमेध बनसोडे यांच्या हस्ते गजानन रामचंद्र रासे यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले.

नांदेड मनपाच्या कर्मचारी पतसंस्थेची मासिक सभा २६ सप्टेंबर रोजी संपन्न झाली. यावेळी ठरावानुसार पतसंस्थेच्या ठराव क्रमांक ७ प्रमाणे संचालक मान्यतेने तज्ज्ञ संचालक गजानन रासे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्या नियुक्तीमुळे तसेच महानगरपालिकेच्या लेखाविषयक त्यांच्या अनुभवाचा पतसंस्थेला नक्कीच लाभ होणार असून, या निवडीबद्दल संचालक मंडळ व मित्र परिवाराने अभिनंदन केले आहे.

# जिल्हा सहकारी शिक्षण पतपेढीची वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहात संपन्न

**नांदेड (प्रतिनिधी)–** मराठवाड्यातील अग्रगण्य व जिल्ह्यातील शिक्षकांची सर्वात मोठी असलेली सहकारी पतपेढी शिक्षण विभाग मर्यादित जिल्हा परिषद नांदेडची ९७ वी वार्षिक सर्वसाधारण सभा येथील श्रीकृष्ण मंगल कार्यालय सभागृहामध्ये उत्साहामध्ये संपन्न झाली.

पतसंस्थेचे अध्यक्ष दिलीप देवकांबळे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या सभेचे उद्‌घाटन अखिल भारतीय प्राथमिक शिक्षक संघाचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष देविदासराव बस्वदे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी फारूक बेग, प्रकाश मुंगल, अशोक पवळे, चंद्रकांत दामेकर, जयवंत काळे, तस्लीम शेख, चंद्रकांत



मेकाले, बालाजी डफडे, बाबुराव फसमले, जी. एस. मंगनाळे, तसलीम शेख, गोविंद कारकिले, गजानन पाटील, उद्धव सूर्यवंशी, संजय शेळगे, बाबुराव कैलासे, गोविंद सोळंके, संतोष कदम, जे. डी. कदम, बाबुराव माडगे, डी. एस. धात्रक, रमेश पवार, गोविंद विभुते यांच्यासह विविध संघटनांचे मंचावर उपस्थित होते.

प्रथम मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांना अभिवादन करून सभेला सुरुवात झाली.

सभेच्या प्रथम सत्रामध्ये शिक्षक सभासदांच्या गुणवंत पाल्यांचा, गुणवंत, यशवंत सभासद शिक्षकांचा, सेवानिवृत्त सभासदांचा, मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

## किनवटला अपर जिल्हाधिकारी कार्यालयासह स्वतंत्र जिल्हा करण्याची मंत्री बावनकुळे यांच्याकडे मागणी



**किनवट (प्रतिनिधी)–** किनवट येथे अपर जिल्हाधिकारी कार्यालय स्थापन करण्यासह किनवटला स्वतंत्र जिल्ह्याचा दर्जा द्यावा, तसेच इस्लापूर व मांडवी यांना स्वतंत्र तालुक्याचा दर्जा द्यावा, अशी मागणी भाजपा अल्पसंख्याक मोर्चाचे नांदेड (उत्तर) जिल्हाध्यक्ष ॲड. माज बडगुजर यांनी महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली.

किनवटचे विस्तीर्ण भौगोलिक क्षेत्र, मोठी लोकसंख्या आणि दुर्गम आदिवासी भाग लक्षात घेता नागरिकांना प्रशासकीय कामांसाठी नांदेडला जावे लागते. त्यामुळे वेळ, पैसा आणि श्रम खर्च होत असून, स्थानिक पातळीवर प्रशासकीय सुविधा उपलब्ध करून देण्याची गरज असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले.

दरम्यान, ॲड. बडगुजर यांच्या मागणीवर महसूलमंत्री बावनकुळे यांनी किनवट येथे अपर जिल्हाधिकारी कार्यालय स्थापन करण्याची प्रक्रिया सुरू असल्याचे सांगितले. तसेच किनवटला स्वतंत्र जिल्ह्याचा दर्जा देण्याबाबत सकारात्मक भूमिका व्यक्त करत 'किनवट जिल्हा शंभर टक्के करू,' अशी ग्वाही दिली. इस्लापूर व मांडवीला स्वतंत्र तालुक्याचा दर्जा देण्याच्या मागणीवरही त्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला.

# अवांतर वाचनातूनच लेखकाची वैचारिक बैठक समृद्ध होते -अनुजा डोईफोडे

- नेसुबो महाविद्यालयात मराठी वाङ्मय मंडळाचे उद्‌घाटन
- युवा लेखक-कवींना वास्तवाशी नाते जोडण्याचे आवाहन

**नांदेड (प्रतिनिधी)–** दर्जेदार साहित्यनिर्मितीसाठी अवांतर वाचन अत्यंत आवश्यक असून, सातत्यपूर्ण वाचनातून लेखकाची वैचारिक बैठक समृद्ध होते. युवा लेखक आणि कवींनी केवळ लिहिण्यापुरते मर्यादित न राहता समाज, माणूस आणि आपल्या सभोवतालच्या वास्तवाचे सूक्ष्म निरीक्षण करावे. आपल्या लेखणीतून काळाचे प्रश्न, सामाजिक वास्तव आणि सामान्य माणसाच्या भावविश्वाला अभिव्यक्ती देण्याचा प्रयत्न करावा, असे मार्गदर्शन प्रसिद्ध लेखिका अनुजा डोईफोडे यांनी केले.

नेताजी सुभाषचंद्र बोस महाविद्यालयातील मराठी विभागाच्या वतीने आयोजित मराठी वाङ्मय मंडळाच्या उद्‌घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपप्राचार्य डॉ. कल्पना कदम होत्या. प्राचार्य डॉ. महेंद्रकुमार कुलकर्णी यांच्या उपस्थितीत मंडळाचे उद्‌घाटन झाले.



युवा लेखक–कवींना मार्गदर्शन करताना अनुजा डोईफोडे म्हणाल्या की, लेखक होण्यासाठी केवळ प्रतिभा पुरेशी नसून त्याला वाचन, चिंतन, निरीक्षण आणि अनुभवांची जोड असणे आवश्यक आहे. कविता किंवा लेखन हे केवळ शब्दांची मांडणी नसून त्यामागे संवेदनशील मन आणि व्यापक जीवनदृष्टी असली पाहिजे. विविध विषयांवरील पुस्तके वाचल्याने भाषेची समृद्धी होते, विचारांना दिशा मिळते आणि लेखनाचा आवाका वाढतो. नव्या पिढीतील लेखकांनी आपल्या स्वतंत्र शैलीचा शोध घेत असताना मराठी साहित्याच्या समृद्ध परंपरेचाही अभ्यास करावा, असे त्यांनी सांगितले.

त्या पुढे म्हणाल्या की, लेखकाने समाजापासून तुटून नव्हे, तर समाजाशी जोडले जाऊन लिहिले पाहिजे. आजच्या बदलत्या काळातील प्रश्न, तरुणांचे अनुभव, स्त्रीजीवन, ग्रामीण वास्तव, सामाजिक विषमता आणि मानवी नात्यांतील बदल यांचे भान साहित्यिकाने ठेवले पाहिजे. वाचनाची सवय, सातत्याने लेखन आणि स्वतःच्या लेखनाचे चिकित्सक परीक्षण या तीन गोष्टी नवोदित लेखकांसाठी महत्त्वाच्या असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

मराठी विभागप्रमुख डॉ. चंद्रशेखर एंगडे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. दत्ता बडुरे यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. यावेळी 'अभिनव' भित्तीपत्रकाचे विमोचन करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. मंगेश अटकोरे यांनी केले, तर आभार श्रुती जंबुरे यांनी मानले.

## गोदावरी अर्बन सर्वोत्तम शाखा प्रभारी म्हणून सिडको शाखेचे गजानन पाटील सन्मानित

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)–** गोदावरी अर्बन बँकेची १३ वी वार्षिक सर्वसाधारण सभा दि. २७ रोजी संपन्न झाली. २०२५ –२०२६ वर्षातील सर्व राज्यांतील सर्वोत्तम शाखा प्रभारी म्हणून सिडको शाखेचे गजानन पाटील यांना संस्थापकीय अध्यक्ष आ. हेमंत पाटील यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

गोदावरी अर्बन बँकेची सर्वसाधारण सभा संस्थापकीय अध्यक्ष आ. हेमंत पाटील यांच्या उपस्थितीत संपन्न झाली. या सभेत उत्कृष्ट शाखाधिकारी म्हणून सिडको शाखेचे शाखाधिकारी गजानन पाटील यांना सन्मानित करण्यात आले. यावेळी नांदेड उत्तरचे आमदार बालाजी पाटील कल्याणकर, दक्षिण विधानसभा मतदारसंघाचे आमदार आनंदराव पाटील बोंढारकर, गोदावरी अर्बनच्या अध्यक्षा सौ. राजश्री हेमंत पाटील, उपाध्यक्षा हेमलता



देसले, सचिव विधिज्ञ रवींद्र रगटे, सर्व संचालक मंडळ, व्यवस्थापकीय संचालक धनंजय तांबेकर, सौ. सुरेखा दवे यांच्या–सह शाखाधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# अंतर्मन

# सूर्यास्तानंतर अंत्यसंस्कार का करू नयेत?

## गरुड पुराण अन् धर्मशास्त्रात काय सांगितले आहे..?



**हिंदू धर्मपरंपरेत जन्मापासून मृत्यूपर्यंत सोळा संस्कार सांगितले आहेत. त्यापैकी अंत्येष्टी संस्कार हा अंतिम आणि अत्यंत महत्त्वाचा संस्कार मानला जातो. त्यामुळे अंत्यसंस्काराची पद्धत, वेळ आणि त्यासंबंधीच्या धार्मिक आचारांना विशेष महत्त्व दिले जाते. सूर्यास्तानंतर अंत्यसंस्कार करू नयेत, अशी परंपरागत धारणा अनेक ठिकाणी आढळते. मात्र, गरुड पुराण आणि विविध धर्मशास्त्रांमध्ये रात्री अंत्यसंस्कार करण्यास प्रत्येक परिस्थितीत पूर्णतः बंदी आहे, असे सरसकट म्हणता येत नाही. वेगवेगळ्या गृह्यसूत्रांमध्ये, धर्मशास्त्रांमध्ये आणि प्रादेशिक परंपरांमध्ये अंत्येष्टीच्या वेळेबाबत वेगवेगळे आचार आढळतात...**

### सूर्यास्तानंतर अंत्यसंस्कार का टाळले जातात?

परंपरागत हिंदू संस्कारपद्धतीत दिवसाचा प्रकाशाचा काळ धार्मिक विधींसाठी अधिक अनुकूल मानला जातो. त्यामुळे अनेक ठिकाणी अंत्यसंस्कार सूर्यास्तापूर्वी पूर्ण करण्याची प्रथा आहे. रात्री अंत्यसंस्कार केल्यास पितरांना त्रास होतो, अशी लोकमान्यता काही भागांत प्रचलित आहे. मात्र, ही बाब सार्वत्रिक शास्त्रीय निषेध म्हणून मांडणे योग्य नाही. अंत्येष्टीची वेळ निश्चित करताना केवळ सूर्यास्ताचा विचार न करता मृत्यूची वेळ, स्थानिक परंपरा, धार्मिक विधी, नक्षत्र आणि अन्य परिस्थितींचाही विचार केला जातो.

### गरुड पुराणात काय सांगितले आहे?

गरुड पुराणातील प्रेतकल्पात मृत्यूनंतर करावयाचे धार्मिक विधी, अंत्ययात्रा, दाहसंस्कार, तर्पण आणि त्यानंतरचे कर्म यांचे वर्णन आढळते. अंत्यसंस्काराची पद्धत सांगतानाच काही विशिष्ट कालखंड आणि परिस्थितींशी संबंधित नियमांचाही उल्लेख केला आहे. त्यामुळे अंत्येष्टी हा केवळ दिवसाच्या वेळेवर अवलंबून असलेला विधी नसून विधी, काल आणि परिस्थिती यांचा विचार करून केला जाणारा संस्कार आहे.

### सूर्यास्तानंतर अंत्यसंस्कार न करण्याची परंपरा कशी रूढ झाली?



गरुड पुराणातील काही प्रसंगांमध्ये रात्री मृतदेह बाहेर नेण्याच्या परिस्थितीशी संबंधित सावधगिरीचे उल्लेख आढळतात. यावरून मृत्यू आणि मृतदेहाशी संबंधित रात्रीच्या परिस्थितींचाही प्राचीन धार्मिक साहित्यात विचार झाल्याचे दिसते. मात्र, सूर्यास्तानंतर अंत्यसंस्कार करू नयेत, ही प्रथा मुख्यतः पारंपरिक अंत्येष्टीविधी, मुहूर्तविचार आणि विविध प्रदेशांतील धार्मिक आचारांशी संबंधित असल्याचे दिसते. आजही अनेक पारंपरिक संस्कारपद्धतींमध्ये सूर्यास्त आणि सूर्योदयाच्या दरम्यान अंत्यसंस्कार टाळण्याचा सल्ला दिला जातो.

### रात्री अंत्यसंस्कार केल्याने पितरांना त्रास होतो का?

रात्री अंत्यसंस्कार केल्याने पितरांना त्रास होतो, अशी धार्मिक श्रद्धा काही ठिकाणी आढळते. मात्र, ही बाब निश्चित आणि सार्वत्रिक शास्त्रीय तथ्य म्हणून मांडता येत नाही. अंत्येष्टीचा मुख्य उद्देश मृत व्यक्तीप्रती श्रद्धा, सन्मान आणि अंतिम कर्तव्य पार पाडणे हा आहे. त्यामुळे धार्मिक परंपरेनुसार वेळ आणि विधी यांचे पालन करणे महत्त्वाचे मानले जाते.

### सूर्यास्तापूर्वी अंत्यसंस्कार शक्य नसेल तर काय करावे?

एखाद्या व्यक्तीचा मृत्यू संध्याकाळी किंवा रात्री झाला आणि सूर्यास्तापूर्वी अंत्यसंस्कार करणे शक्य झाले नाही, तर अशा परिस्थितीत कुटुंबाची परंपरा, स्थानिक धार्मिक आचार आणि परिस्थिती यांचा विचार केला जातो. अशा वेळी कुटुंबाच्या परंपरेनुसार आणि पुरोहित किंवा आचार्यांच्या मार्गदर्शनानुसार अंत्यसंस्काराची वेळ निश्चित केली जाऊ शकते. अंत्येष्टी हा अत्यंत संवेदनशील आणि महत्त्वाचा संस्कार असल्याने त्यामध्ये धार्मिक विधींसोबतच स्थानिक परिस्थिती आणि प्रत्यक्ष व्यवहार्य बाबींचाही विचार करणे आवश्यक ठरते.



# पितृपक्षात जन्मलेली मुले कशी असतात?

## ज्योतिषीय मान्यतेनुसार जाणून घ्या स्वभाव अन् करिअर...

**हिंदू धर्मपरंपरेत पितृपक्षाला विशेष महत्त्व आहे. या काळात पूर्वजांचे स्मरण करून श्राद्ध, तर्पण आणि पिंडदान केले जाते. त्याचवेळी पितृपक्षात जन्मलेल्या मुलांबाबतही काही विशेष ज्योतिषीय आणि धार्मिक मान्यता प्रचलित आहेत. पितृपक्षात जन्मलेली मुले भाग्यवान असतात आणि त्यांच्यावर पूर्वजांचे आशीर्वाद असतात, अशी श्रद्धा काही परंपरांमध्ये आढळते. काही ज्योतिषीय मतांनुसार, अशा मुलांचा जन्म एखाद्या विशेष उद्देशाने झालेला असतो. काही ठिकाणी तर पितृपक्षात जन्मलेले मूल हे त्याच कुळातील पूर्वजांचे पुनर्जन्मरूप असू शकते, अशीही धारणा आहे. काही ज्योतिषीय मान्यतांनुसार, अशा मुलाच्या जन्मामुळे कुटुंबातील पितृदोष कमी होण्यास मदत होते, असे मानले जाते. मात्र, या सर्व गोष्टी धार्मिक आणि ज्योतिषीय श्रद्धांवर आधारित आहेत.**

### पितृपक्षात जन्मलेल्या मुलांचा स्वभाव

- » लहानपणापासूनच समजूतदार : ज्योतिषीय मान्यतेनुसार, पितृपक्षात जन्मलेली मुले लहानपणापासूनच समजूतदार आणि परिपक्व स्वभावाची असू शकतात. त्यांच्या वयाच्या तुलनेत त्यांच्यात अधिक समज आणि विचार करण्याची क्षमता दिसून येते, अशी धारणा आहे.
- » कुटुंबाशी घट्ट नाते : अशा मुलांचे आई-वडील आणि कुटुंबातील इतर सदस्यांशी घट्ट भावनिक नाते असते, असे मानले जाते. कुटुंबातील सदस्यांना सोबत घेऊन चालणे आणि कुटुंब एकत्र ठेवण्याला ते महत्त्व देतात, अशी ज्योतिषीय धारणा आहे.
- » संवेदनशील आणि अंतर्ज्ञानी : पितृपक्षात जन्मलेल्या मुलांचा स्वभाव संवेदनशील असल्याचे मानले जाते. त्यांना इतरांच्या भावना सहज समजू शकतात. दुसऱ्यांच्या अडचणी आणि दुःखाची जाणीव त्यांना लवकर होते, अशीही धारणा आहे.
- » अतिविचार करण्याची प्रवृत्ती : ज्योतिषीय मतानुसार, चंद्राच्या स्थितीचा मन आणि भावनांवर परिणाम होतो. त्यामुळे अशा मुलांना एखादी छोटी गोष्टही मनाला लावून घेण्याची किंवा एखाद्या विषयाचा अतिविचार करण्याची प्रवृत्ती असू शकते, असे मानले जाते.
- » भावनिक आणि कधी कधी रागीट : या मुलांच्या मनःस्थितीत चढ-उतार जाणवू शकतात, अशी ज्योतिषीय धारणा आहे. आनंद असो किंवा दुःख, ते भावना तीव्रतेने व्यक्त करू शकतात. भावनिक संवेदनशीलतेमुळे काही वेळा त्यांना लवकर राग येऊ शकतो.
- » मित्रपरिवार मर्यादित : अशा मुलांना मोठ्या गर्दीत मिसळण्यापेक्षा मोजक्या व्यक्तींशी जवळीक ठेवणे अधिक पसंत असते, असे मानले जाते. ते आपले मन प्रत्येकासमोर न उघडता निवडक व्यक्तींशीच भावना आणि विचार शेअर करतात. त्यामुळे त्यांचा मित्रपरिवार तुलनेने मर्यादित असू शकतो.





### पितृपक्षात जन्मलेल्या मुलांचे करिअर

- » सर्जनशील क्षेत्रात प्रगती : ज्योतिषीय मान्यतेनुसार, अशा मुलांमध्ये सर्जनशीलता आणि कलात्मक गुण असू शकतात. त्यामुळे लेखन, संगीत, माध्यमे, अभिनय, कला आणि डिझाइन यांसारख्या क्षेत्रांकडे त्यांचा कल असू शकतो.
- » संशोधन आणि व्यवस्थापन क्षेत्र : एखाद्या विषयाच्या मुळापर्यंत जाण्याची त्यांची प्रवृत्ती असल्याचे मानले जाते. त्यामुळे संशोधन, कायदा, शिक्षण, व्यवस्थापन आणि विश्लेषणाशी संबंधित क्षेत्रांमध्ये ते चांगली कामगिरी करू शकतात, अशी ज्योतिषीय धारणा आहे. आर्थिक नियोजन, वित्त, मालमत्ता आणि व्यवस्थापनाशी संबंधित कामांमध्येही त्यांना रस निर्माण होऊ शकतो, असे मानले जाते.
- » कुटुंबासाठी भाग्यवान? : काही धार्मिक आणि ज्योतिषीय मान्यतांनुसार, अशा मुलांच्या जन्मानंतर कुटुंबात सकारात्मक बदल घडतात आणि आर्थिक स्थितीत सुधारणा होऊ शकते. आपल्या कर्तृत्वामुळे ही मुले कुटुंबाचे नाव उज्ज्वल करू शकतात, अशी श्रद्धा आहे.
- » स्वतःचा व्यवसाय करण्याची शक्यता : पितृपक्षात जन्मलेल्या मुलांमध्ये स्वतंत्र विचार करण्याची आणि स्वतःच्या पद्धतीने काम करण्याची क्षमता असल्याचे काही ज्योतिषीय मतांमध्ये सांगितले जाते. त्यामुळे भविष्यात स्वतःचा व्यवसाय सुरू करण्याकडे त्यांचा कल असू शकतो आणि योग्य नियोजन व मेहनतीने ते व्यवसायात प्रगती करू शकतात, अशी धारणा आहे.

### पितृपक्षात जन्म म्हणजे काय विशेष?

पितृपक्षात जन्मलेल्या मुलांबाबत विविध धार्मिक आणि ज्योतिषीय मान्यता प्रचलित आहेत. पूर्वजांचे आशीर्वाद, कुटुंबाशी घट्ट नाते, संवेदनशील स्वभाव आणि सर्जनशीलता यांसारखे गुण त्यांच्यात असतात, असे या मान्यतांमध्ये सांगितले जाते. मात्र, एखाद्या मुलाचा स्वभाव, बुद्धिमत्ता, करिअर किंवा भवितव्य केवळ तो पितृपक्षात जन्मला आहे म्हणून निश्चित होते, असे वैज्ञानिकदृष्ट्या सिद्ध झालेले नाही. मुलाच्या व्यक्तिमत्त्वावर त्याचे संगोपन, शिक्षण, वातावरण, अनुभव, आवडीनिवडी आणि वैयक्तिक प्रयत्न यांचा मोठा प्रभाव असतो. त्यामुळे पितृपक्षात जन्मलेल्या मुलाकडे विशेष श्रद्धेने पाहता येईल; मात्र त्याच्या भवितव्याचा निर्णय केवळ जन्मकाळ किंवा ज्योतिषीय मान्यतांच्या आधारे न घेता त्याच्या गुणांना, आवडीला आणि क्षमतेला योग्य संधी देणे अधिक महत्त्वाचे ठरते.

# गया व्यतिरिक्त या 6 तीर्थस्थळीही पितृकर्माला विशेष महत्त्व

## श्राद्ध, तर्पण अन् पिंडदानाने पितरांना शांती मिळते, अशी धार्मिक मान्यता...

**हिंदू धर्मपरंपरेत पितृपक्षात पितरांचे श्राद्ध, तर्पण आणि पिंडदान करण्याला विशेष महत्त्व आहे. बिहारमधील गया हे पितृकर्मासाठी प्रसिद्ध तीर्थक्षेत्र मानले जाते. मात्र, गया व्यतिरिक्त देशातील इतर काही तीर्थस्थळांनाही पितृकर्मासाठी अत्यंत पवित्र मानले जाते. धार्मिक मान्यतेनुसार, या ठिकाणी श्राद्ध, तर्पण किंवा पिंडदान केल्याने पितरांना शांती मिळते आणि पितृऋणातून मुक्ती मिळण्यास मदत होते. काही धार्मिक ग्रंथांमध्ये या तीर्थक्षेत्रांचे माहात्म्यही वर्णन केले आहे...**



### पिहोवा तीर्थ : भीष्म पितामहांच्या अंत्यसंस्काराशी संबंधित मान्यता

*हरियाणातील कुरुक्षेत्र परिसरातील पिहोवा हे पितृकर्मासाठी महत्त्वाचे तीर्थक्षेत्र मानले जाते. येथे पिंडदान केल्यास अश्वमेध यज्ञाइतके पुण्य मिळते, अशी धार्मिक मान्यता आहे. पद्मपुराण, वामनपुराण आणि भागवतपुराणातही पिहोवा तीर्थाचे माहात्म्य वर्णन केले असल्याचे सांगितले जाते. महाभारत युद्धानंतर श्रीकृष्ण आणि पांडवांनी युद्धात मृत्युमुखी पडलेल्या योद्ध्यांसाठी येथे पिंडदान केले, अशीही आख्यायिका आहे. त्यामुळे पितरांचे श्राद्ध आणि पिंडदान करण्यासाठी भाविक मोठ्या संख्येने येथे जातात.*

### उत्तराखंडमधील ब्रह्मकपाल



बद्रीनाथजवळील ब्रह्मकपाल हे देखील पिंडदानासाठी महत्त्वाचे तीर्थ मानले जाते. येथे पितृकर्म केल्याने पूर्वजांना शांती मिळते आणि त्यांना पुढील गती प्राप्त होते, अशी धार्मिक श्रद्धा आहे. पौराणिक कथेनुसार, भगवान शिवाला ब्रह्महत्येचे पाप लागले होते आणि हाताला ब्रह्माचे छिन्नमस्तक चिकटले होते. बद्रीनाथजवळील एका शिळेवर ते मस्तक त्यांच्या हातातून खाली पडले आणि शिवांना ब्रह्महत्येच्या पापातून मुक्ती मिळाली, अशी आख्यायिका आहे. त्यानंतर या स्थानाला वरदान मिळाले की, येथे श्राद्ध करणाऱ्या व्यक्तीच्या अनेक पिढ्यांतील पितरांना सद्गती मिळेल.

### पुष्कर, त्र्यंबकेश्वर

राजस्थानातील पुष्कर तीर्थ हे श्राद्ध, तर्पण आणि पिंडदानासाठी पवित्र मानले जाते. धार्मिक कथेनुसार, रामायणकाळात भगवान श्रीरामांनी याच ठिकाणी वडील दशरथ यांचे श्राद्ध केले होते. त्यामुळे पितरांच्या शांतीसाठी भाविक पुष्करला जातात. महाराष्ट्रातील नाशिक जिल्ह्यातील त्र्यंबकेश्वर हे देखील पितृकर्मासाठी प्रसिद्ध तीर्थक्षेत्र आहे. येथे श्राद्ध, तर्पण आणि पिंडदान करण्याची परंपरा आहे. पितरांच्या शांतीसाठी भाविक या ठिकाणी धार्मिक विधी करतात.



### खंभातच्या आखातातील बक्रेश्वर तीर्थ

*गुजरातमधील खंभातच्या आखाताशी संबंधित बक्रेश्वर तीर्थाचाही पितृकर्मासाठी उल्लेख केला जातो. स्कंदपुराणातील कुमारिकाखंडात या तीर्थाचे माहात्म्य सांगितल्याचे मानले जाते. पौराणिक कथेनुसार, एका राजकन्येने भगवान शिवांची येथे तपश्चर्या केली होती. पूर्वजन्मी ती बकरी होती, अशी आख्यायिका आहे. तिच्या तपश्चर्येने प्रसन्न होऊन भगवान बक्रेश्वर प्रकट झाले आणि त्यांनी वरदान दिले. या ठिकाणी अंत्यसंस्कार करून अस्थी किंवा राख विसर्जित केल्यास मृतात्म्याला मुक्ती मिळते, अशी धार्मिक मान्यता आहे.*

### प्रयागराज संगम

उत्तर प्रदेशातील प्रयागराजला हिंदू धर्मपरंपरेत 'तीर्थराज' म्हणून विशेष महत्त्व आहे. गंगा, यमुना आणि अदृश्य सरस्वती यांच्या संगमस्थळी श्राद्ध, तर्पण आणि पिंडदान करण्याची परंपरा आहे. धार्मिक मान्यतेनुसार, संगमावर पितृकर्म केल्याने पितरांना शांती मिळते आणि त्यांच्या आशीर्वादाने कुटुंबाचे कल्याण होते. त्यामुळे पितृपक्षात येथेही मोठ्या संख्येने भाविक पितृकर्मासाठी येतात.



# नांदेड जिल्ह्यातील मुखेड, मुदखेडसह १९ तालुक्यांत सर्व्हेचे मंत्रिमंडळ उपसमितीचे आदेश



**मुंबई (प्रतिनिधी)** – राज्य सरकारने महाराष्ट्रातील २६५ तालुक्यांमध्ये अधिकृतपणे दुष्काळ जाहीर केल्यानंतर आता उर्वरित तालुक्यांमधील स्थितीवरही नजर ठेवली जात आहे. लोकप्रतिनिधींनी केलेल्या मागणीची दखल घेत सरकारने दुष्काळ घोषित केलेल्या तालुक्यांव्यतिरिक्त अन्य १९ तालुक्यांमध्ये तातडीने सर्वेक्षण आणि ग्राउंड ट्रुथिंग करण्याचे कडक निर्देश दिले आहेत.

मंगळवारी पार पडलेल्या मंत्रिमंडळ उपसमितीच्या बैठकीत हा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. या १९ तालुक्यांमधील प्रमुख ५ पिकांचे २० टक्के सर्वेक्षण करून प्रशासनाने लवकरात लवकर अहवाल सादर करावा, अशा स्पष्ट सूचना बैठकीत देण्यात आल्या आहेत.

शासनाने दिलेल्या माहितीनुसार, दुष्काळ सर्वेक्षणासाठी निवडलेल्या १९ तालुक्यांची जिल्हानिहाय यादी खालीलप्रमाणे आहे:

नांदेड : मुदखेड, मुखेड आणि अर्धापूर, चंद्रपूर : जिवती, ब्रह्मपुरी आणि बल्लारपूर, गोंदिया : आमगाव, देवरी, सालेकसा आणि गोंदिया, वर्धा : कारंजा, भंडारा : मोहाडी आणि तुमसर, नाशिक : त्र्यंबकेश्वर, चांदवड आणि निफाड, सातारा : पाटण, सांगली : शिराळा आणि वाळवा दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने शेतकऱ्यांना मोठा दिलासा दिला आहे. भारतीय रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक तत्त्वांची अंमलबजावणी करत राष्ट्रीयकृत बँकांनी दुष्काळग्रस्त भागातील नियमांचे पालन करावे, अशा सूचना देण्यात आल्या आहेत.

तसेच खासगी बँका आणि जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांनी शेतकऱ्यांकडून किंवा नागरिकांकडून कर्जवसुली करताना कोणतीही जबरदस्ती अथवा सक्ती करू नये, याबाबत सहकार विभागाने कडक निर्देश जारी करावेत, असे आदेश बैठकीत देण्यात आले.

आगामी काळात जनावरांच्या चाऱ्याची भीषण टंचाई निर्माण होऊ नये यासाठी पशुसंवर्धन विभागाने आत्तापासूनच नियोजन करण्यास सुरू केले आहे. पारंपारिक चारा छावण्यांऐवजी प्रभावी पर्यायांचा अभ्यास केला जात आहे.

ज्या भागात अतिरिक्त चारा उपलब्ध आहे, तेथून तुटवडा असलेल्या भागात चारा पोहोचवण्यासाठी 'सिलो' व्यवस्थापन प्रक्रियेचा वापर करून पुढील १५ दिवसांत ठोस उपाययोजना लागू करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

गावांमध्ये पिण्याच्या पाण्याची टंचाई जाणवल्यास तिथे तातडीने टँकरद्वारे पाणी पुरवठा केला जाईल. मोठ्या क्षमतेचे टँकर जाण्यास रस्ते किंवा इतर अडचणी असल्यास लहान क्षमतेच्या टँकरचा वापर करून गावांमध्ये पाणी पोहोचवण्यास प्राधान्य दिले जाईल.

# दुष्काळी परिस्थितीमुळे महावितरणच्या कर्मचाऱ्यांना मुख्यालय सोडण्यास सक्त मनाई



**मुंबई (प्रतिनिधी)** – राज्यात दुष्काळाची छाया पसरली असल्याने महावितरणने संपूर्ण तांत्रिक यंत्रणेला 'हायअलर्ट'वर देत शासनाच्या दुष्काळ उपाययोजनांची अंमलबजावणी करण्यासाठी सर्व अभियंते, यंत्रचालक आणि तारमार्ग कर्मचाऱ्यांना मुख्यालय न सोडण्याचे सक्त आदेश दिले आहे. याबाबत महावितरणचे संचालक (संचालन) श्री. धनंजय औंढेकर यांनी नुकतेच परिपत्रक जारी केले आहे.

यंदाच्या जून महिन्यापासून राज्यात पर्जन्यमानामध्ये मोठी तूट नोंदवण्यात आली आहे. त्यामुळे राज्याच्या बहुतांश भागात दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे. सोबतच शेती पिकांचे नुकसान होत आहे. या गंभीर परिस्थितीची दखल घेत राज्य शासनाने विविध उपाययोजना जाहीर केल्या आहेत. त्यानुसार महावितरणने देखील राज्यभरातील तांत्रिक यंत्रणा सतर्क केली आहे.

मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव तथा महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र यांच्या आदेशानुसार महावितरणचे संचालक श्री. धनंजय औंढेकर (संचालन), श्री. योगेश गडकरी (वाणिज्य), श्री. सचिन तालेवार (प्रकल्प), श्री राजेंद्र पवार (मानव संसाधन) यांच्यासह सर्व कार्यकारी संचालकांनी विविध परिमंडलांमध्ये तातडीने दौरे करून दुष्काळी परिस्थितीत कृषिपंपांसह सर्व वर्गवारीतील ग्राहकांना सुरळीत वीजपुरवठ्यासाठी विविध तांत्रिक कामांचा आढावा घेतला तसेच वीजयंत्रणेची पाहणी करून आवश्यक उपायांचे निर्देश दिले.

यासोबतच महावितरणने सर्व क्षेत्रीय कार्यालयातील अभियंते, यंत्रचालक आणि तारमार्ग कर्मचाऱ्यांना आपापल्या मुख्यालयात उपस्थित राहण्याचे आदेश दिले आहेत. कोणत्याही अधिकारी किंवा कर्मचाऱ्यांना पूर्वपरवानगीशिवाय मुख्यालय सोडता येणार नाही असे स्पष्ट करण्यात आले आहे. दुष्काळी परिस्थितीमध्ये प्रामुख्याने शेतीसह इतर सर्व ग्राहकांसाठी महत्त्वाचा असलेला वीजपुरवठा सुरळीत राहील याची विशेष खबरदारी घ्यावी. एखाद्या कारणामुळे वीजपुरवठा खंडित झाल्यास पर्यायी व्यवस्थेतून किंवा तातडीने दुरुस्ती कामे करून तो पूर्ववत करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

# शिवभोजन केंद्रांवर सरकारचा सर्जिकल स्ट्राईक!

## पार्सल सेवा बंद, सीसीटीव्ही अनिवार्य अन्यथा रोज ५ हजारांचा दंड

**मुंबई (प्रतिनिधी)** – महायुती सरकारने राज्यातील गरीब, मजूर आणि गरजू नागरिकांसाठी अत्यंत सवलतीच्या दरात दिल्या जाणाऱ्या 'शिवभोजन योजने'च्या अंमलबजावणीबाबत अत्यंत मोठा आणि कडक निर्णय घेतला आहे. योजनेतील गैरप्रकार रोखण्यासाठी आणि पारदर्शकता आणण्यासाठी अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाने जुने सर्व परिपत्रक अधिक्रमित करून नवी सर्वसमावेशक नियमावली जारी केली आहे.

१ ऑक्टोबर २०२६ रोजी निर्गमित करण्यात आलेल्या या नवीन शासन निर्णयानुसार सर्व शिवभोजन केंद्रांवर अब सीसीटीव्ही बसवणे अनिवार्य करण्यात आले असून नियमांचे उल्लंघन झाल्यास कडक दंडात्मक कारवाई केली जाणार आहे. शासनाने जारी केलेल्या नव्या नियमावलीनुसार, प्रत्येक शिवभोजन थाळीचे मूल्य शहरी भागात ५० रुपये आणि ग्रामीण भागात ३५ रुपये निश्चित करण्यात आले आहे. लाभार्थ्यांकडून प्रति थाळी फक्त १० रुपये आकारले जातील, तर उर्वरित अनुदान शासन केंद्रचालकाला देईल. वेळ : सर्व शिवभोजन केंद्रे रोज सकाळी ११:०० ते दुपारी ३:०० या वेळेतच सुरू राहतील. थाळी संख्या : प्रत्येक केंद्रात दररोज किमान ७५ ते कमाल २०० थाळ्यांचे वितरण करणे अनिवार्य राहील. बसण्याची क्षमता : केंद्रात एका वेळी किमान २५ व्यक्तींच्या जेवणासाठी बसण्याची व्यवस्था असावी लागेल. प्राधान्य : दिव्यांग व्यक्ती, ज्येष्ठ नागरिक, गरोदर महिला आणि लहान मुले असलेल्या महिलांना रांगेत उभे न करता प्राधान्याने भोजन दिले जाईल.

योजनेतील पारदर्शकता टिकवण्यासाठी सरकारने अन्न वाटपाच्या नियमात मोठे बदल केले आहेत. शिवभोजन केंद्रात बाहेरचे जेवण आणण्यास किंवा केंद्रातील जेवण बाहेर पार्सल नेण्यास पूर्णपणे बंदी घालण्यात आली आहे. भोजनाचा आस्वाद केंद्रावरच बसून घ्यावा लागेल. याशिवाय, शासकीय कर्मचारी आणि ज्या ठिकाणी हे केंद्र सुरू आहे तेथील आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांना या सवलतीच्या थाळीचा लाभ घेण्यास सक्त मनाई करण्यात आली आहे. शिवभोजन योजनेत बनावट लाभार्थी दाखवून होणारे गैरप्रकार रोखण्यासाठी प्रत्येक केंद्रात पूर्ण परिसर व्यापेल अशी सीसीटीव्ही यंत्रणा बसवणे बंधनकारक केले आहे. केंद्रातील भोजन वाटपाच्या वेळेतील कमीत कमी मागील ९० दिवसांचे (३ महिने) फुटेज तपासणीसाठी जतन करून ठेवावे लागेल. अधिकारी मागतील तेव्हा हे फुटेज पेन ड्राईव्ह किंवा स्टोरेज डिव्हाईसमध्ये उपलब्ध करून देणे केंद्रचालकाची जबाबदारी असेल.

सौम्य अनियमितता (वेळेवर केंद्र न उघडणे, स्वच्छता नसणे) : कारणे दाखवा नोटीस दिली जाईल. वारंवार चूक झाल्यास कडक कारवाई होईल. गंभीर अनियमितता (CCTV बंद असणे, पूर्वकल्पना न देता केंद्र बंद ठेवणे) : दररोज किमान १ दिवसाच्या पूर्ण थाळींची रक्कम किंवा ५००० रुपये दंड (यापैकी जी रक्कम जास्त असेल) ठोठावण्यात येईल. अतिगंभीर अनियमितता (शिळे/निकृष्ट दर्जाचे जेवण देणे, दुबार फोटो अपलोड करणे) : केंद्राची मंजुरी तात्काळ रद्द करून केंद्र कायमचे बंद केले जाईल.

# मुंबई-पुणे मिसिंग लिंकला समांतर आता 'वॉटर लिंक'! कोकणातील पुराचे पाणी मराठवाड्याकडे वळवणार



**मुंबई (प्रतिनिधी)** – मुंबई-पुणे एक्स्प्रेस वे वरील बहुचर्चित 'मिसिंग लिंक'च्या धर्तीवर आता महाराष्ट्राच्या पाणीप्रश्नावर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी एका अत्यंत महत्त्वाकांक्षी योजनेचा प्रस्ताव समोर आला आहे. कोकणात दरवर्षी पुराच्या रूपात समुद्राला जाऊन मिळणारे अतिरिक्त पाणी पश्चिम घाटाच्या पूर्वेकडील दुष्काळी भागात वळवण्यासाठी 'वॉटर लिंक टनेल' उभारण्याची मागणी करण्यात आली आहे.

'किसान आर्मी'चे नेते प्रफुल्ल कदम यांनी हा क्रांतिकारी प्रस्ताव थेट राज्य सरकारसमोर मांडला असून, या योजनेमुळे महाराष्ट्र आणि दक्षिण भारतातील अनेक राज्यांची पाण्याची टंचाई कायमची दूर होऊ शकते, असा दावा केला आहे. कोकण भागात मान्सूनच्या काळात मोठ्या प्रमाणावर पाऊस पडतो आणि पुराचे अब्जावधी लिटर पाणी वाया जाऊन समुद्राला मिळते. कोकणातील तब्बल २४९.४३ टीएमसी अतिरिक्त पाणी एका विशाल बोगद्याद्वारे पश्चिम घाट ओलांडून मराठवाड्याच्या दुष्काळी पट्ट्यात वळवण्याची मागणी या प्रस्तावात करण्यात आली आहे.

हा वॉटर लिंक प्रोजेक्ट यशस्वी झाल्यास मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र आणि पश्चिम महाराष्ट्रातील दुष्काळग्रस्त तालुक्यांना संजीवनी मिळणार आहे. मुंबई-पुणे मिसिंग लिंकप्रमाणेच आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून हा अंडरग्राउंड टनेल तयार केल्यास पाण्याचे बाष्पीभवन होणार नाही आणि थेट आवश्यक त्या धरणांमध्ये पाणी पोहोचवता येईल.

या योजनेमुळे केवळ महाराष्ट्रातील शेतकरी आणि नागरिकांचाच नव्हे, तर पाण्यासाठी संघर्ष करणाऱ्या शेजारील दाक्षिणात्य राज्यांचाही पाणीप्रश्न कायमस्वरूपी मिटवण्यास मोठी मदत होणार आहे. आता या प्रस्तावावर राज्य सरकार काय भूमिका घेते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

एल निनोच्या परिणामामुळे राज्यात यंदा मोठ्या प्रमाणावर दुष्काळ पडला असून जवळपास ८० टक्के पिकांचे नुकसान झाल्याचं चित्र आहे. राज्यासमोर यंदा दुष्काळाची गंभीर चिंता आहे. परंतु या आव्हानाचा सामना करत पुढील काळात महाराष्ट्राला दुष्काळमुक्त करणार असल्याचा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. राज्यात ज्या ठिकाणी जास्त पाऊस पडतो त्या ठिकाणचे पाणी हे अवर्षणग्रस्त प्रदेशात नेण्याचे नियोजन सुरू असल्याचं मुख्यमंत्री म्हणाले. त्यासाठी राज्यात नदीजोड प्रकल्प राबवण्यात येणार असल्याची माहितीही त्यांनी दिली.

# दिवेआगर बीचवर सहल ठरली शेवटची...; पुण्यातील ८ विद्यार्थी समुद्रात बुडून मृत

**रायगड (प्रतिनिधी)** – रायगड जिल्ह्यातील अत्यंत लोकप्रिय आणि सुंदर असलेल्या दिवेआगर बीचवर एक अत्यंत हृदयद्रावक आणि दुर्दैवी दुर्घटना घडली आहे. समुद्रात पोहण्यासाठी उतरलेल्या पुण्यातील एका खासगी कोचिंग क्लासच्या सहलीतील ८ विद्यार्थ्यांचा पाण्याच्या खोलीचा अंदाज न आल्यामुळे बुडून मृत्यू झाला आहे. या घटनेमुळे पुण्यासह दिवेआगर परिसरात मोठी शोककळा पसरली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पुण्यातील आळंदी परिसरातील 'विनर्स' या खासगी कोचिंग क्लासची सहल विद्यार्थ्यांसह दिवेआगर येथे आली होती. आनंदाने आणि उत्साहात सुरू असलेली ही सहल एका क्षणात काळीकुट्ट ठरली. सहलीदरम्यान काही विद्यार्थी समुद्राचा आनंद लुटण्यासाठी आणि पोहण्यासाठी पाण्यात उतरले होते. मात्र, पाण्याचा खोलीचा नेमका अंदाज न आल्याने हे ८ विद्यार्थी अचानक खोल पाण्यात ओढले गेले आणि पाण्यात बुडाले.

विद्यार्थी समुद्रात बुडाल्याचे लक्षात येताच बीचवर एकच हलकल्लोळ उडाला. घटना समजताच बीचवर उपस्थित असलेल्या 'महाकाली वॉटर स्पोर्ट्स'च्या सतर्क कर्मचाऱ्यांनी आणि स्थानिक नागरिकांनी कसलाही विलंब न करता तातडीने समुद्रात धाव घेतली. स्थानिक नागरिकांच्या मदतीने बचावकार्य वेगाने राबवण्यात आले आणि बुडालेल्या सर्व विद्यार्थ्यांना बाहेर काढण्यासाठी आटोकाट प्रयत्न करण्यात आले. शर्थीच्या प्रयत्नांनंतर आठही जणांना पाण्यातून बाहेर काढण्यात यश आले, परंतु दुर्दैवाने उशीर झाल्यामुळे पाण्याचा दाब आणि गुदमरल्यामुळे या सर्व ८ विद्यार्थ्यांचा जागीच मृत्यू झाला होता.

एकाच क्लासमधील ८ तरुण विद्यार्थ्यांचा असा अचानक अंत झाल्यामुळे मृत विद्यार्थ्यांच्या कुटुंबीयांवर आणि मित्रपरिवारावर मोठा आघात झाला असून सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे. समुद्रकिनाऱ्यांवर पर्यटनासाठी जाताना सुरक्षेच्या नियमांचे पालन करणे आणि लहान मुलांच्या व विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेची विशेष काळजी घेणे किती गरजेचे आहे.

# पाकिस्तानचा अफगाणिस्तानात हवाई हल्ला, ९ जणांचा मृत्यू

**इस्लामाबाद (वृत्तसंस्था)** – पाकिस्तानने गुरुवारी अफगाणिस्तानच्या कुनार आणि हेलमंड प्रांतात हवाई हल्ले केले. अफगाण तालिबान सरकारच्या म्हणण्यानुसार, या हल्ल्यांमध्ये ९ जणांचा मृत्यू झाला असून ११ जण जखमी झाले आहेत. मृतांमध्ये महिला आणि मुलांचाही समावेश आहे.

तालिबान सरकारचे प्रवक्ते जबीहुल्लाह मुजाहिद यांनी याची माहिती दिली आहे. रॉयटर्सच्या वृत्तानुसार, त्यांनी सांगितले की पाकिस्तानी हल्ल्यांमध्ये दोन्ही प्रांतांतील ३ घरे उद्ध्वस्त झाली आहेत.

पाकिस्तानने अफगाणिस्तानवर केलेला हा ११वा हल्ला होता. वृत्तांनुसार, या हल्ल्यांमध्ये आतापर्यंत सुमारे ८०० जणांचा मृत्यू झाला आहे.

पाकिस्तानचा दावा आहे की गुरुवारी त्याने दोन ठिकाणी दहशतवाद्यांच्या तळांना लक्ष्य केले. यात किमान २२ लढवय्ये मारले गेले. मात्र, जबीहुल्लाह मुजाहिद यांनी या हल्ल्यांचा निषेध केला आहे. त्यांनी म्हटले की पाकिस्तानने चुकीचे कृत्य केले आहे. हे आंतरराष्ट्रीय नियमांचे उल्लंघन असून त्याचे समर्थन केले जाऊ शकत नाही.

पाकिस्तान आणि अफगाणिस्तानमधील वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर तालिबान सरकारचे मंत्री नूरुल्लाह नूरी यांनी पाकिस्तानला अफगाणांच्या संयमाची परीक्षा न घेण्याचा इशारा दिला आहे.


## Change In Name

My Old Name is **SWAPNA HANMANTRAO KULKARNI**.Now I am Changing as a New Name **SWAPNA LAXMIKANT APASTAMBH**.Forth My All Correspondence will be done as per my New Name. Please kindly consider the same.

**Address - SWAPNA LAXMIKANT APASTAMBH, Venkateshwara Apartment E-wing, Flat No. E-106, Pharande Park, Wadi Road, Wadi Bk. Nanded 431605 Mo.No. 9850631685**

## कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.

संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८



## Change In Name

My Old Name is **SHAIKH AIJAS KHAJAMIYA**.Now I am Changing as a New Name **SHAIKH AIJAJ KHAJAMIYA**. Forth My All Correspondence will be done as per my New Name. Please kindly consider the same.

**Address - SHAIKH KHAJAMIYA H.No. 39, Near Water Tank, Wajegaon, Nanded 431602 Mo.No. 9552742574**

## Change In Name

My Old Name is **SHAISTA AFREEN MOHAMMED ZAID**.Now I am Changing as a New Name **SHAISTA AFREEN**. Forth My All Correspondence will be done as per my New Name. Please kindly consider the same.

**Address - H.No.9-7-287, Hyderbagh No.2, Near Hydri Masjid Nanded 431604 Mo.No. 9960390290**

## जाहीरप्रगटन

भोकर येथील दिवाणी न्यायालय व. स्तर, भोकर यांच्या न्यायालयात

समक्ष श्री. आर.आर. पत्की साहेब दिवाणी न्यायालय व. स्तर, भोकर जि. नांदेड

किरकोळ अर्ज क्र. २५२/२०२६

१) रुक्मीनबाई राजेश्वरराव देशमुख,
वय- ६० वर्षे, धंदा- घरकाम,
२) शंकरराव राजेश्वरराव देशमुख,
वय- ६० वर्षे, धंदा- शेती,
३) दिलीप राजेश्वरराव देशमुख,
वय- ५५ वर्षे, धंदा- शेती
४) रावसाहेब राजेश्वरराव देशमुख,
वय. ५० वर्षे, धंदा.शेती,
सर्व रा. देवठाणा, ता. भोकर, जि. नांदेड.
५) सुमित्रा महेश टाले,
वय. ४९ वर्षे, धंदा. घरकाम,
रा. शिवाजी नगर, हिंगोली, ता.जि. हिंगोली

विरूध्द

निरंक

दावा:- बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट १८२७ च्या कलम ०३ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत....

ज्याअर्थी अर्जदाराने या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र अर्ज केला आहे ज्याअर्थी अर्जदार क्र. १ ते ५ मयत राजेश्वरराव चंपतराव देशमुख यांचे वारस आहेत. मयत राजेश्वरराव चंपतराव देशमुख यांचा मृत्यू दिनांक ०४/१२/२०२४ रोजी झाला.

अर्जदार हेच मयताचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदाराशिवाय कोणीही मयताचे वारस नाहीत. अर्जदार यांनी मान्यवर न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. तरी प्रस्तुत प्रकरणी अर्जदार यांच्या नावे वारसा प्रमाणपत्र देण्यास कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी तो स्वतःता न्यायालयात दिनांक ३०/१०/२०२६ रोजी किंवा एक महिन्यामध्ये नोंदवावा. मुदतीनंतर येणाऱ्या आक्षेपाचा विचार करण्यात येणार नाही व अर्जाची पुढील सुनावणी करण्यात येईल.

आज दिनांक ३०/०९/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी

आदेशावरून

क. लिपीक, दिवाणी न्यायालय व. स्तर, भोकर

अधिक्षक, दिवाणी न्यायालय व. स्तर, भोकर

## जाहिरप्रगटन

बिलोली येथील दिवाणी न्यायाधीश व. स्तर, ता. बिलोली जि. नांदेड यांचे न्यायालयात,

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२१२/२०२६ पुढील तारीख – ०२.११.२०२६

अर्जदार : ०१. दैवशाला भ्र. गोविंद जमलवाड, वय – ३१ वर्षे, धंदा –शेती, रा. आरळी ता.बिलोली जि.नांदेड
०२. अनुष्का पि. गोविंद जमलवाड ,(अज्ञान) वय – १३ धंदा – शिक्षण,
०३. शिवाणी पि. गोविंद जमलवाड ,(अज्ञान) वय – १५ धंदा – शिक्षण
०४. ज्ञानेश्वर पि. गोविंद जमलवाड ,(अज्ञान) वय – १० धंदा – शिक्षण
०५. स्वरांजली पि. गोविंद जमलवाड ,(अज्ञान) वय – ०८ धंदा – शिक्षण

विरुध्द.

गैरअर्जदार: १. शाखाधिकारी स्टेट बँक ऑफ इंडिया शाखा बिलोली ता.बिलोली जि. नांदेड

विषय– भारतीय वारसा कायदा कलम ३७२ प्रमाणे अर्ज ..

ज्याअर्थी अर्जदार ह्यांनी मा. न्यायालयात दिवाणी किरकोळ अर्ज दाखल केला असून त्यात अर्जदारांचे असे कथन आहे की, अर्जदार क्र ०१ ते ०५ हे मयत गोविंद मारोती जमलवाड यांचे कायदेशीर वारस आहेत अर्जदाराने कथन केले आहे की, मयत गोविंद मारोती जमलवाड यांचे अर्जदार क्र ०२ व ०५ अपत्ये आहेत व अर्जदार क्र ०१ ही मयत गोविंद मारोती जमलवाड यांची पत्नी आहे. मयत गोविंद मारोती जमलवाड यांचा मृत्यु दिनांक १८.०८.२०२५ रोजी आरळी ता.बिलोली येथे झाला. अर्जदाराने अर्जामध्ये असे कथन केले की, गैरअर्जदार यांच्या शाखेत खालील तक्ता मध्ये दर्शविलेले खाते क्रमांक मध्ये रक्कम जमा आहे.

| Branch Name | Sr No. | Account No. | Sum assured on maturity |
| --- | --- | --- | --- |
| १. शाखाधिकारी स्टेट बँक ऑफ इंडिया शाखा बिलोली ता.बिलोली जि. नांदेड | 1. | ६२२४१३०८११२ | Rs.६२,२५३.०३/- |

त्याअर्थी सदरहू अर्जदार यांनी मा. न्यायालयात सदर मयत गोविंद मारोती जमलवाड यांचे कायदेशीर वारस प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज दाखल केला आहे. तरी वरील अर्जदार हे सदर मयत गोविंद मारोती जमलवाड यांचे कायदेशीर वारस नाहीत असे कोणास समजाविण्याचे असेल अगर सदर मयत गोविंद मारोती जमलवाड यांचे कोणी इतर वारस असल्यास त्यांनी या जाहिरप्रगटन प्रसिध्दीच्या तारखेपासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात हजर होऊन किंवा वकीलामार्फत आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत काहीही हरकती न प्राप्त झाल्यास सदरहू अर्जदार हे सदर मयत गोविंद मारोती जमलवाड यांचे वारस असल्याचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत झाल्यास त्यांना सदरहू सदर मयत यांचे कायदेशीर वारस असल्याचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक ३०/०९/२[illegible] कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिले.

आदेशावरून.

क. लिपीक, दिवाणी न्यायालय व. स्तर., बिलोली

सहा. अधिक्षक, दिवाणी न्यायालय व. स्तर., बिलोली

## डिग्री प्रमाणपत्र हरवले

माझे अनुराधा बालाजी कमठाणे या नावाची एम.फिल.ची शारिरीक शिक्षण विषयाची डिग्री प्रमाणपत्र श्रावस्तीनगर ते बसस्टँड दरम्यान हरवले आहे. कोणाला सापडल्यास खालील पत्यावर संपर्क साधावा.

संपर्क पत्ता –
अनुराधा बालाजी कमठाणे
मो.नं. ८४८४९४९६२७

## जाहीर प्रगटन

सर्व जनतेस जाहीररित्या कळविण्यात येते की, अर्जदार- नागनाथ खंडू आंबाटे रा. धानोरा मक्ता ता. लोहा जि.नांदेड यांनी मौ. धानोरा मक्ता ता. लोहा येथील शेत गट क्रं. ७०४ मधील ०१ हे.६२ आर महाराष्ट्र शेतजमीन (जमीन धारणेची कमाल मर्यादा) अधिनियम, १९६१ सुधारीत नियम-२०२६ नुसार भोगवटदार वर्ग २ मधून वर्ग १ मध्ये रुपांतर करणे बाबतचा विनंती अर्ज केलेला आहे.

तेंव्हा मौ. धानोरा मक्ता ता. लोहा येथील शेत गट क्रं. ७०४ मधील ०१ हे.६२ आर ही जमीन महाराष्ट्र शेतजमीन (जमीन धारणेची कमाल मर्यादा) अधिनियम, १९६१ सुधारीत नियम-२०२६ चे कलम ३(१) नुसार भोगवटदार वर्ग २ मधून वर्ग १ मध्ये रुपांतर करणे बाबत कोणाचा काही आक्षेप/उजर/तक्रार इत्यादी असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसाचे आत लेखी स्वरुपात या कार्यालयात कागदोपत्री पुराव्यासह आक्षेप अर्ज सादर करावा.

विहीत मुदतीत कुणाचा आक्षेप/उजर/तक्रार इत्यादी प्राप्त न झाल्यास सदरच्या रुपांतरण प्रकियेस कुणाचाही आक्षेप नाही, असे समजण्यात येवून सदर प्रकरणात नियमाप्रमाणे पुढील कार्यवाही करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

तसेच सदर प्रकरणात विहीत मुदतीनंतर आलेले आक्षेप/उजर/तक्रार इत्यादी विचारात घेतली जाणार नाहीत.

(अजय शिंदे)
उपजिल्हाधिकारी (महसूल)
जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड

**रामबाण ईलाज**

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::

**सेवा क्लिनीक**

गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९

संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७११७०१, ९८६०७२१३५६



# गोदातीर समाचार



**पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस**

हर्बल ट्रिटमेंट

१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकूण, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड

मो. 9284804221, 9637704308




## हातात झाडू घेऊन दिव्यांगांची गांधीगिरी; नांदेडमध्ये शेकडो दिव्यांगांचे अनोखे आंदोलन

### ◆ दिव्यांगांच्या प्रलंबित प्रश्नांकडे लक्ष वेधले, विशेष शाळांच्या चौकशीचीही मागणी

**नांदेड (प्रतिनिधी)–** दिव्यांग नागरिक आणि दिव्यांग विद्यार्थ्यांच्या प्रलंबित प्रश्नांकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी गुरुवारी नांदेडमध्ये हातात झाडू घेऊन गांधीगिरी पद्धतीने स्वच्छता अभियान राबवत अनोखे आंदोलन करण्यात आले. जिल्हाधिकारी आणि नांदेड– वाघाळा महानगरपालिका आयुक्त यांच्या निवासस्थानासमोर तसेच महापालिका कार्यालय परिसरात हे आंदोलन झाले.



सर्वसमावेशक दिव्यांग सशक्तीकरण असोसिएशनचे संस्थापक अध्यक्ष राहुल सीताराम साळवे यांच्या नेतृत्त्वाखाली हे आंदोलन करण्यात आले. यावेळी शेख उमर, बाबू डुकरे, संभाजी सोनाळे, मिलिंद सितळे, प्रमोद मांजरमकर, रवी कोकरे, भोजराज शिंदे, संजय धुलधाणी, आतिक हुसेन, सय्यद आरिफ, कार्तिक कुमार भरतीपुरम, शिवाजी सूर्यवंशी, मोहम्मद सुफियान, आशिष हनवते, रामेश्वर बंडेवार, गोविंद बरुडे, शेख मतीन, शेख आलीम, अब्दुल माजीद, शेख माजीद, अजय गोरे, राजू इराबत्तीन, प्रशांत हणमंते, किरणकुमार न्यालापल्ली, चंद्रशेखर पौला, नागेश निरडी, मो. नसीम, तेजू महाराज, मुंजाजी कावळे, भाग्यश्री नागेश्वर, अफरोजा खानम, सरोज नारलावार, कल्पना सकते, सविता गवते यांच्यासह शेकडो दिव्यांग सहभागी झाले होते.

आंदोलनादरम्यान वजीराबाद, शिवाजीनगर आणि भाग्यनगर पोलीस ठाण्यांकडून कडेकोट बंदोबस्त ठेवण्यात आला होता. दिव्यांगांचे आंदोलन शांततेत पार पडले.

महापालिका आयुक्तांच्या स्नेहनगर येथील निवासस्थानासमोर आंदोलन सुरू असताना मनपा उपायुक्तांनी भेट देऊन आंदोलकांचे म्हणणे ऐकून घेतले आणि निवेदन स्वीकारून प्रश्न लवकर सोडविण्याचे आश्वासन दिले. त्यानंतर जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, मनपा आयुक्त आणि पोलीस अधीक्षक यांना निवेदन देण्यात आले.

महानगरपालिकेतील दिव्यांग आरक्षण, २०० चौ. फूट जागा व शासकीय गाळे, दिव्यांगांचा शासकीय अनुशेष भरून काढणे, घरकुल व इतर योजनांचा लाभ देणे, दिव्यांगांसाठीच्या ५ टक्के निधीचा पारदर्शक वापर या प्रमुख मागण्या आहेत. तसेच नांदेड जिल्ह्यातील दिव्यांग विशेष शाळांमधील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता, नियुक्ती, उपस्थिती, अनुभव, विद्यार्थी संख्या, पदमान्यता आणि शासन अनुदान यांची प्रत्यक्ष पडताळणी करावी, अशी मागणी करण्यात आली.

## लातुरात मटका आणि जुगार अड्ड्यांवर 'डीआयजी' पथकाच्या धाडी

### २२ जणांविरुद्ध कारवाई, ३ लाखांचा मुद्देमाल जप्त

**नांदेड (प्रतिनिधी)–** लातूर जिल्ह्यात अवैध धंदे सुरू असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्यानंतर नांदेड परिक्षेत्राचे पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी विशेष पथक लातूरमध्ये रवाना केले होते. या पथकाने ३० सप्टेंबर रोजी तीन ठिकाणी धाडी टाकून २२ जणांविरुद्ध कारवाई करत सुमारे २ लाख ९७ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.



**पहिली कारवाई - गांधी मार्केट**

गांधी मार्केट परिसरातील एका शटरमध्ये सुरू असलेल्या मटका बुकीवर धाड टाकण्यात आली. येथून १५,६१० रुपयांची रोकड आणि ५८,००० रुपये किमतीचे ७ मोबाईल जप्त करण्यात आले. या प्रकरणी ७ इसमांविरुद्ध गांधी चौक पोलीस ठाण्यात गु.र.नं. ६७१/२०२६ कलम १२ (अ) महाराष्ट्र जुगार कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

**दुसरी कारवाई - गुळ मार्केट**

गुळ मार्केट ते सम्राट चौकाकडे जाणाऱ्या रोडवर आर. के. बार शेजारील शटरमध्ये सुरू असलेल्या मटका बुकीवर दुसरी कारवाई करण्यात आली. येथून ३९,४३० रुपयांची रोकड आणि २७ हजार रुपयांचे ३ मोबाईल जप्त करण्यात आले. ५ जणांविरुद्ध गांधी चौक पोलीस ठाण्यात गु.र.नं. ६७२/२०२६ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला.

**तिसरी कारवाई - कासार शिरशी**

कासार शिरशी पोलीस ठाण्याच्या हद्दीत बसवेश्वर चौकाजवळ पत्र्याच्या शेडसमोर तिर्रट नावाचा जुगार खेळणाऱ्यांवर कारवाई करण्यात आली. येथून २०,१०० रुपयांची रोकड, ७ मोबाईल आणि २ मोटारसायकली असा एकूण १,५७,१०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. १० जणांविरुद्ध कासार शिरशी पोलीस ठाण्यात गु.र.नं. २४४/२०२६ अन्वये गुन्हा दाखल झाला.

अशा प्रकारे तीनही कारवायांमध्ये एकूण ७५,१४० रुपयांची रोकड, १७ मोबाईल आणि २ मोटारसायकली असा एकूण २,९७,१४० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

या कारवाईत पोलीस उपनिरीक्षक पंकज इंगळे यांच्यासह पोहेकॉ. प्रदीप खानसोळे, गणेश राठोड, संदीप वाघाडे आणि गजानन डवरे यांनी सहभाग घेतला. उल्लेखनीय कामगिरीबद्दल पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी पथकाचे अभिनंदन केले आहे.

## पतीकडून पत्नीचा गळा दाबून खून, तर भाग्यनगर हद्दीत रस्त्यात अडवून तरुणाला लुटले

**नांदेड (प्रतिनिधी)–** शहराच्या जुना कौठा भागातील श्रीपाद नगर येथे किरकोळ कारणावरून पत्नीचा गळा दाबून पतीने खून केला आहे, तर दुसऱ्या घटनेत रस्त्यात अडवून एकाला लुटल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी नांदेड ग्रामीण आणि भाग्यनगर पोलीस ठाण्यात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, पत्नीचा खून करणाऱ्या पतीला पोलिसांनी अटक केली आहे.

**पत्नीचा गळा दाबून खून**

ही घटना नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीतील श्रीपाद नगर, जुना कौठा येथे घडली. दि. २९ सप्टेंबर रोजी सकाळी दहाच्या सुमारास आरोपी पती श्रीनिवास सुरेश राठी (वय ३६ वर्षे, रा. श्रीपाद नगर) याने कौटुंबिक वादातून पत्नी प्रीती श्रीनिवास राठी (वय २५ वर्षे) हिचा गळा दाबून खून केला. घटनेची माहिती समजताच पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर व त्यांचे सहकारी तसेच फॉरेनशीकची टीमही घटनास्थळी दाखल झाली.

याप्रकरणी मयताची नातेवाईक शारदाबाई नाना आहेरवार, वय ५१, रा. खरूस बु., ता. उमरखेड यांनी दिलेल्या फिर्यादीवरून नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात गु.र.नं. १२७७/२०२६ कलम १०३(१) BNS अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असून, पुढील तपास पोउपनि बाबुराव चव्हाण करत आहेत.

**मारहाण करून लुटमार**

दुसरी घटना भाग्यनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली. दि. २८ सप्टेंबर रोजी रात्री ८.३० वाजता शिवराय पार्क रोडवर फिर्यादी निखिल सुरेश इंगोले (वय २८, रा. शिवराय नगर, नांदेड) हे जात असताना आरोपी सतीश हिंगोले, रा. श्रावस्तीनगर आणि अनिकेत कांबळे, रा. शिवराय नगर यांनी संगनमत करून त्यांची मोटारसायकल अडवली.

तसेच शिवीगाळ करून काठीने मारहाण करत त्यांच्या खिशातील ५ हजार ५०० रुपये काढून घेतले आणि मोटारसायकलवर दगड मारून ७ हजार रुपयांचे नुकसान केले.

## कमी पर्जन्यमानाच्या पार्श्वभूमीवर मनपा आयुक्तांनी घेतली पाटबंधारे विभागासमवेत बैठक

### आगामी काळातील पाणी पुरवठ्याचे नियोजन करण्याचे निर्देश

**नांदेड (प्रतिनिधी)–** एल-निनोच्या प्रभावामुळे चालू वर्षात सरासरीपेक्षा अत्यंत कमी पाऊस झाला असून, आगामी काळात जिल्ह्यात दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. या गंभीर परिस्थितीची वेळेत दखल घेत, नांदेड शहराचा पाणी पुरवठा आगामी काळात सुरळीत कसा राहील आणि उपलब्ध पाण्याचे काटेकोर नियोजन कसे करता येईल यासाठी मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोइफोडे यांनी दि. १ ऑक्टोबर २०२६ रोजी पालिका मुख्यलयात पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांसमवेत एक तातडीची व महत्त्वाची बैठक घेतली.

एल-निनो प्रभावामुळे यावर्षी अत्यंत कमी पाऊस झाला असून, आगामी काळात नांदेड शहराचा पाणी पुरवठा विस्कळीत होऊ नये आणि नागरिकांना टंचाईचा सामना करावा लागू नये, यासाठी या बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली. या बैठकीला नांदेड उत्तर पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता सी. आर. बनसोड, उपअभियंता सतीश चव्हाण, मनपाचे अतिरिक्त आयुक्त गिरीश कदम, शहर अभियंता सुमंत पाटील आणि कार्यकारी अभियंता संघरत्न सोनसळे, उपअभियंता प्रकाश कांबळे आदी अधिकारी उपस्थित होते.



बैठकीत प्रामुख्याने शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या विष्णुपुरी जलाशयामध्ये सद्यस्थितीत ८४.६१ टक्के उपलब्ध पाणीसाठा असून, सदर पाणीसाठा पुढील पावसाळ्यापर्यंत कसा वापरता येईल यावर सविस्तर चर्चा झाली. तसेच किवळा साठवण तलाव व इसापूर धरणातून उपलब्ध होणाऱ्या पाणी साठ्यावरसुध्दा चर्चा करण्यात आली. एल-निनोमुळे पावसाचे प्रमाण घटल्याने आगामी उन्हाळ्यात पाण्याची तीव्र टंचाई जाणवू नये, यासाठी मनपा आणि पाटबंधारे विभागाने संयुक्तपणे काम करून पाणी बचतीचा आणि वितरणाचा योग्य आराखडा तयार करावा, असे निर्देश आयुक्त डॉ. महेशकुमार डोइफोडे यांनी दिले. त्याचप्रमाणे पाणी पुरवठा करणाऱ्या धरणांमधील व प्रकल्पांमधील पाणीसाठ्याचे वेळोवेळी अचूक मोजमाप करून त्याप्रमाणे पाण्याचे रोटेशन ठरवणे. मुख्य जलवाहिन्यांची होणारी गळती तातडीने रोखणे आणि पाण्याचा अपव्यय किंवा अनधिकृत उपसा करणाऱ्या घटकांवर प्रतिबंध करणे आदी उपाययोजना करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

आगामी पाण्याचे संकट लक्षात घेता नांदेड शहरातील नागरिकांनी पाण्याचा वापर अत्यंत काटकसरीने करावा. पिण्याचे पाणी इतर कामांसाठी वाया घालवू नये, असे आवाहन प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

## जागतिक रेबीज दिनानिमित्त नांदेडमध्ये ३५० श्वानांचे लसीकरण, रेबीजमुक्तीचा संदेश

**नांदेड (प्रतिनिधी)–** जागतिक रेबीज दिनाचे औचित्य साधून नांदेड शहरात भटक्या आणि पाळीव श्वानांसाठी विशेष रेबीज प्रतिबंधक लसीकरण मोहीम राबविण्यात आली. उत्कर्ष ग्लोबल फाउंडेशन आणि नांदेड-वाघाळा शहर महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या उपक्रमात सुमारे ३५० श्वानांना रेबीज प्रतिबंधक लस देण्यात आली.



रेबीज हा प्राण्यांपासून मानवाला होणारा गंभीर आणि जीवघेणा आजार आहे. मात्र वेळेत केलेले लसीकरण, प्राण्यांची योग्य काळजी आणि जनजागृतीच्या माध्यमातून त्याला प्रभावीपणे रोखता येते याच उद्देशाने ही मोहीम राबविण्यात आली.

श्वानांचे नियमित लसीकरण हे केवळ प्राण्यांच्या आरोग्यासाठीच नव्हे, तर मानवातील रेबीजचा प्रसार रोखण्यासाठीही अत्यंत आवश्यक आहे. त्यामुळे अशा मोहिमांना विशेष महत्त्व आहे.

उत्कर्ष ग्लोबल फाउंडेशनचा "Rabies Mukti Mission 2030' हा उपक्रम लसीकरणासोबतच जनजागृती, सुरक्षित प्राणी-मानव सहजीवन, कुत्रा चावल्यानंतरचे तातडीचे प्रथमोपचार आणि Post-Exposure Care बाबत जागरूकता निर्माण करण्यावर भर देतो.

या उपक्रमातून स्थानिक प्रशासन, सामाजिक संस्था, पशुवैद्य आणि नागरिकांनी एकत्र येऊन काम केल्यास रेबीज प्रतिबंध अधिक प्रभावी होऊ शकतो, हा संदेश देण्यात आला.

**लसीकरणाची साथ रेबीजमुक्त भविष्याची वाट!**

या संदेशासह फाउंडेशनने नागरिकांना पाळीव श्वानांचे नियमित लसीकरण करण्याचे आणि भटक्या श्वानांबाबत संवेदनशील व जबाबदार दृष्टिकोन ठेवण्याचे आवाहन केले.

रेबीजमुक्त भारत २०३० हे उद्दिष्ट गाठण्यासाठी शासन, स्थानिक स्वराज्य संस्था, पशुवैद्यकीय तज्ज्ञ, सामाजिक संस्था आणि नागरिकांचा एकत्रित आणि सातत्यपूर्ण सहभाग आवश्यक आहे. नांदेडमधील हा उपक्रम त्याच दिशेने टाकलेले एक महत्त्वाचे पाऊल आहे.

## जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयात शौर्यदिन उत्साहात साजरा

### शौर्यदिनानिमित्त वीरनारी, वीरमाता-पिता व माजी सैनिकांचा सत्कार

**नांदेड (प्रतिनिधी) –** येथील जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयात २९ सप्टेंबर रोजी शौर्यदिन उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त जिल्ह्यातील वीरनारी, वीरमाता-पिता तसेच माजी सैनिक संघटनांच्या पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला.

जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी ले. (निवृत्त) कर्नल राहुल माने यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ईसीएचएस नांदेडचे कर्नल एस. जॉन रस्किन (निवृत्त) होते. प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा माहिती कार्यालयाचे चंद्रकांत कारभारी उपस्थित होते. भारतीय माजी सैनिक संघटनेचे अध्यक्ष सार्जंट रामराव थडके, सैनिक फेडरेशन मराठवाड्याचे अध्यक्ष लक्ष्मण देवदे यांच्यासह ३ वीरनारी, १ वीर पिता आणि विविध लष्करी मोहिमांमध्ये सहभागी झालेले माजी सैनिक उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी कल्याण संघटक ऑ. कॅप्टन बळीराम गिराम (निवृत्त) यांनी प्रास्ताविकातून शौर्यदिनाचे महत्त्व विशद केले. भारतीय सशस्त्र दलाने २९ सप्टेंबर २०१६ रोजी नियंत्रण रेषेपलीकडे दहशतवादी तळांवर केलेल्या सर्जिकल स्ट्राईकच्या शौर्यपूर्ण कारवाईचे स्मरण यावेळी करण्यात आले. १८ सप्टेंबर २०१६ रोजी जम्मू-काश्मीरमधील उरी येथे लष्करी तळावर झालेल्या दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर ही कारवाई करण्यात आली होती, असे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाच्या माध्यमातून देशाच्या संरक्षणासाठी योगदान देणाऱ्या माजी सैनिकांच्या शौर्याला आणि त्यागाला अभिवादन करण्यात आले. जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी ले. (निवृत्त) कर्नल राहुल वैजनाथ माने यांनी उपस्थित सर्व माजी सैनिकांना शौर्यदिनाच्या शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सार्जंट रामराव थडके (निवृत्त), अर्जुन जाधव, अनिल देवज्ञे, सूर्यकांत कदम, माधव कल्याणकर आणि नायब सुभेदार गंगाधर हटकर यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचा समारोप वसतिगृह अधीक्षक सुबेदार अर्जुन जाधव (निवृत्त) यांच्या आभार प्रदर्शनाने झाला.

## नांदेडमध्ये रविवारी महाराष्ट्र ग्रामीण बँक निवृत्त कर्मचारी संघटनेचे तृतीय द्वैवार्षिक अधिवेशन

**नांदेड (प्रतिनिधी)–** भारतीय मजदूर संघाशी संलग्न असलेल्या महाराष्ट्र ग्रामीण बँक निवृत्त कर्मचारी संघटनेचे तिसरे द्वैवार्षिक अधिवेशन रविवार, दि. ४ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ वाजता हॉटेल ताज पाटील येथे होणार आहे.

या अधिवेशनाचे उद्घाटन फोरम ऑफ रिटायर्ड बँक एम्प्लॉईज, पुणेचे महामंत्री डॉ. चंद्रशेखर बारगजे यांच्या हस्ते होणार असून, अध्यक्षस्थानी महाराष्ट्र ग्रामीण बँकेचे अध्यक्ष गिरीश थोरात राहणार आहेत.

या कार्यक्रमासाठी बँक ऑफ महाराष्ट्रचे संचालक प्रसेनजीत फडणवीस, फोरम ऑफ रिटायर्ड बँक एम्प्लॉईजचे उपाध्यक्ष मोहन शनवारे आणि भारतीय मजदूर संघाचे प्रदेश संघटनमंत्री बाळासाहेब भुजबळ हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत.

महाराष्ट्र ग्रामीण बँक निवृत्त कर्मचारी संघटना ही ग्रामीण बँकेतील सेवानिवृत्तांच्या प्रश्नांसाठी लढा देणारी संघटना असून, आतापर्यंत पेन्शन, ग्रॅच्युईटी, मेडिक्लेम, अनुकंपा भरती आदी प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न केले आहेत. या अधिवेशनात बँकिंग उद्योगातील ताजा घडामोडींची माहिती, तसेच संघटनेमार्फत न्यायालयात सुरू असलेल्या खटल्यांची माहिती देण्यात येणार आहे. सोबतच संघटनेच्या पुढील वाटचालीची दिशा ठरविली जाणार आहे.

याच अधिवेशनात वयाची ७५ वर्षे पूर्ण केलेले सदस्य गणेश पांडे, पी. जी. नाईक, बी. एस. दमकोंडवार, बी. के. झरीकर, एल. आर. आठवले यांचा अमृतमहोत्सवी सत्कार करण्यात येणार आहे.

या अधिवेशनाला संघटनेच्या सर्व सदस्यांनी, इतर संघटनांच्या प्रतिनिधींनी व हितचिंतकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन अध्यक्ष सुदर्शन पांडागळे, सरचिटणीस राम दुगाळे, जी. आर. देशमुख, एल. एन. खंडेलोटे, प्रमोद अंबेकर, राम कपाळे, एस. बी. जाधव, शिवाजी देशमुख, एस. एम. फुलवळकर, बी. एम. सरसे, व्ही. डी. जोशी, के. वाय. कल्याणकर, बी. एस. उत्तरवार, के. सी. देशमुख, एस. जी. कुलकर्णी, एच. व्ही. सिलगमवार, डी. जी. वाघमारे, एम. वाय. वाघमारे, बालाजी बनसोडे, अरुण जोशी, एल. के. पांडे, श्रीकांत गोगटे, कृष्णा कुलकर्णी, व्ही. जे. पाटील, संजय दीक्षित, एन. व्ही. इंगोले आदींनी केले आहे.

## नांदेडमध्ये ४ ऑक्टोबरला रंगणार 'वंदे मातरम् महोत्सव २०२६'

### समूहगायन, समूह नृत्य, देशभक्तीपर गीत-काव्यवाचनासह विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन

**नांदेड (प्रतिनिधी)–** 'वंदे मातरम्' गीताच्या १५० व्या वर्धापन दिनानिमित्त संस्कृती मंत्रालय, भारत सरकार व सप्तरंग सेवाभावी संस्था, नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य 'वंदे मातरम् महोत्सव २०२६'चे आयोजन करण्यात आले आहे. हा महोत्सव रविवार, दि. ४ ऑक्टोबर २०२६ रोजी शंकरराव चव्हाण प्रेक्षागृह, नांदेड येथे रंगणार आहे.

देशभक्तीची भावना आणि भारतीय कला-संस्कृतीला अभिवादन करण्याच्या उद्देशाने आयोजित या महोत्सवात दुपारी १२ वाजेपासून रात्री ९ वाजेपर्यंत विविध स्पर्धा व सांस्कृतिक कार्यक्रमांची रेलचेल असणार आहे. यामध्ये समूहगायन स्पर्धा, समूह नृत्य स्पर्धा, देशभक्तीपर गीतांचे सादरीकरण, विविध मान्यवरांचे नृत्य सादरीकरण तसेच देशभक्तीपर काव्य-वाचन आदी कार्यक्रमांचा समावेश आहे.




यासोबतच रील स्पर्धा तसेच आंतरशालेय निबंध, चित्रकला व वक्तृत्व स्पर्धेतील विजेत्यांचा पारितोषिक वितरण समारंभ रात्री ८ वाजता आयोजित करण्यात आला आहे. वक्तृत्व स्पर्धा सायंकाळी ५ वाजता शंकरराव चव्हाण प्रेक्षागृह परिसरात होणार असून, इच्छुकांना त्यामध्ये सहभाग नोंदविता येणार आहे.

या संपूर्ण महोत्सवासाठी प्रवेश विनामूल्य असून नांदेडकरांसाठी हा भरगच्च सांस्कृतिक व देशभक्तीपर कार्यक्रमाची मेजवानी ठरणार आहे. 'वंदे मातरम्'ला विशेष अभिवादन आणि आदरांजली अर्पण करण्यासाठी आयोजित या महोत्सवाचा नांदेडकरांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून आनंद घ्यावा, असे आवाहन डॉ. सान्वी जेठवाणी, अध्यक्ष, सप्तरंग सेवाभावी संस्था, नांदेड व विशेष कार्यकारी अधिकारी, नांदेड यांनी केले आहे.


**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.

फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com